म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........
२८००
BVBK-0402890

९१९८४

निवेदक:
शंकर अभ्यंकर

# सॉलोमनचा खजिना

'किंग सॉलोमन्स माइन्स'
या जगप्रसिद्ध कादंबरीचा संक्षिप्त अनुवाद

BVBK-0402890

मेहता पब्लिशिंग हाऊस

■ प्रथमावृत्ती नोव्हेंबर, १९९३

■ प्रकाशक
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे.

■ मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि.,
कोथरूड,
पुणे.

■ अक्षरजुळणी
इन्द्र कॉम्प्युटर्स,
'तृप्तिदीप', ४१, एल. आय. सी. कॉलनी,
योगाचार्य कोल्हटकर पथ,
४२/२, पर्वती
पुणे.

■ मुखपृष्ठ
बाबू उडुपी

■ किंमत पंचवीस रुपये

■ © सौ. अपर्णा अभ्यंकर

वाचनालय
2180
विषय

सॉलोमनला
रंजिना

गोष्टीवेल्हाळ
अभिजित, जितेन्द्र, अश्विनी,
आदित्य आणि अमित
यांना-

# अनुक्रमणिका

१. सर हेन्रींची चित्तरकथा ५

२. उम्बोपाचं गूढ १७

३. कुकुआनाच्या राज्यात २८

४. चंद्रग्रहण ४०

५. खजिन्यातून सुटका ५१

म. ग्र. भ., ... शाखा.
... विभाग
2120
विषय

# १. सर हेन्रींची चित्तरकथा

आभाळ सगळं दाटून आलेलं. संध्याकाळची वेळ. मी माझ्या खोलीत उगाचंच विचार करत बसलोय्. कितीतरी वेळ.

असे किती तास गेले कुणास ठाऊक. शेवटी माझं मलाच हसू आलं. आता तसा काही मी लहान नाही. आजच मला पंचावन्नावं वर्षं लागलं.

माझ्या मित्रांनी माझा वाढदिवस दणक्यात साजरा केला. खाण्यापिण्याची अगदी रेलचेल झाली.

थोड्या वेळापूर्वी मित्र पांगले आणि मी हा असा बसलो माझ्या खोलीत. काहीतरी विचार करत.

माझं मलाच आश्चर्य वाटतं. माझ्या गतआयुष्याकडं वळून पहाताना मजा वाटते. एका पेक्षा एक थरारक अनुभवानं माझं सगळं आयुष्य भरलयं.

त्यातलं काही आज मी सांगायचं ठरवलंय्.

प्रसंग कोणते निवडावेत एवढाच प्रश्न माझ्या डोळ्यापुढे उभा आहे.

अरे हो, माझं नावच सांगायला विसरलो मी ! तर माझं नाव ॲलन क्वॅटरमन. मी तसा दक्षिण अफ्रिकेतला. अख्ख्या जगाला प्रदक्षिणा केलीय मी. खरं तर छंदच माझा तो !

शिकार तर मला फारच आवडते. त्यात खरं आव्हान असतं. जंगलच्या कायद्याशी एकरूप होताना मजा येते. वाघ- सिंहाना सामोरं जाऊन त्यांना गोळी घालायची म्हणजे थट्टा नव्हे. पण मला हे सगळं आवडायचं. अजूनही आवडतं म्हणा !

तर मी दक्षिण आफ्रिकेचा. दर्बान, नाताळ या परिसरातला. अजूनही लोक मला शिकारी समजतात. कोरीव दाढी मिशा ही माझी वैशिष्ट्ये.

माझ्या निळ्या डोळ्यात जबरदस्त ताकद आहे, असं माझे मित्र मला म्हणतात.

आज मी तुम्हाला एक अद्भुत कथा सांगणार आहे. ही कथा इतकी चमत्कारीक आणि थरारक आहे, की कदाचित् तुमचा त्यावर विश्वासही बसायचा नाही.

सॉलोमन राजाचं नाव कधी ऐकलं तुम्ही ? जगातला सगळ्यात शहाणा पुरुष म्हणून आजही जग ओळखतं त्याला.

सॉलोमन राजा शहाणा तर होताच पण, लक्ष्मीही त्याला प्रसन्न होती. त्यानं अगणित संपत्ती जमवली.

माणसाच्या स्वभावाचा त्याला परिचय असल्यामुळं त्यानं दूरवर विचार केला आणि संपत्ती अवघड डोंगरात एका अंधाऱ्या गुहेत लपविली.

सॉलोमनचा हा खजिना शोधण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. पण कुणालाच यश आलं नाही.

जे जे म्हणून शोधायला गेले, त्यांना कवडीसुध्दा हाताशी लागली नाही. खजिन्याच्या आशेने जे जे गेले त्या बहुतेकांना मृत्यू आला. चुकून जे जगले वाचले ते भ्रमिष्टझाले. काही जण कायमचे लुळेपांगळे झाले.

तुम्हाला सांगूनही खरं वाटायचं नाही पण, मी स्वतः सॉलोमनच्या खजिन्यात जाऊन आलोय. का ? दचकलात काय ?

घाबरु नका. माझी तब्येत अजूनही खणखणीत आहे आणि हेच अद्भुत आज मी तुम्हाला सांगायचं ठरवलयं.---

---अठरा महिन्यांपूर्वीची गोष्ट. त्यावेळी मी समुद्रमार्गानं प्रवास करत होतो. आमच्या जहाजाचं नाव होतं डंकेल्ड. जहाजावर कितीतरी माणसं होती. पण त्यापैकी दोघांशी माझी चांगली गट्टी जमली. ते दोघंही ब्रिटीश होते.

मी केपटाऊन शहरातून परत निघालो होतो. हत्तींची शिकार मनाजोगी झाल्यामुळं मी स्वतःवरच प्रसन्न होतो.

त्या दोन ब्रिटीश माणसांपैकी एक होते, सर हेन्री कर्टिस. असा भला मोठा मनुष्य मी दुसरा पाहिला नाही.

सर हेन्री यांची उंची असावी साडेसहा फुटाहूनही अधिक. रुंद खांदे, तगडा

देह, बळकट शरीर,-- असं त्यांचं व्यक्तीमत्त्व.

त्यांच्या दाढीमिशा सोनेरी रंगाच्या होत्या. नाक सरळ आणि धारदार. समोरच्या माणसाकडं पहायला लागले की असे धारदार बघत असत की, त्यांच्या नजरेला नजर द्यायची हिंमत होत नसे.

सर हेन्रीचा एक मित्र त्यांच्याबरोबर प्रवासात होता. त्याचं नाव होतं जॉन गुड.

नौदलात तो कॅप्टन होता. भलताच नीटनेटका आणि व्यवस्थित रहाणारा. दिवसातून दोन वेळेला घोटून घोटून दाढी करायची त्याला सवय होती.

त्याची आणखी काही वैशिष्ट्यं होती. त्याच्या उजव्या डोळ्याला एक जाड भिंग नेहमी लावलेलं असे. त्या भिंगाबद्दल मी कधी विचारलं तर गदगदा हसून तो म्हणायचा,

'गोळी लागली मला. पण गंमत म्हणजे अजूनही त्या डोळ्यानं पाहू शकतो मी.'

तो हसला की, माझ्या लक्षात यायचं, जॉन गुडच्या तोंडातले दात खरे नाहीत. चक्क कवळी होती ती.

या दोघांशी माझा चांगला परिचय झाल्यावर एके दिवशी सर हेन्री मला म्हणाले,

'ॲलन, आता आपली चांगली मैत्री झालीय्. आज रात्री आपण जेवण एकत्रच घेऊया.'

मी आनंदानं होकार दिला. सर हेन्री यांच्या केबीनमध्ये आम्ही रात्रीचं जेवण घेतलं. आमच्या अगदी दिलखुलास गप्पा झाल्या.

सर हेन्री आपल्या सोनेरी दाढीतून बोटं फिरवत मला म्हणाले,

'ॲलन, गतवर्षी तू ट्रान्सवॉल या ठिकाणी होतास नाही !'

'हो ! दोन माजलेल्या वाघांची शिकार केली होती मी.'

'मला माहित आहे ते. तू नेव्हिली नावाच्या माणसाला भेटला होतास का ?'

'अर्थातच ! आम्ही जवळ जवळ पंधरा दिवस एकत्र राहिलोही होतो. नेव्हिली माझ्या चांगलाच लक्षात आहे.'

सर हेन्री थोडावेळ काहीच बोलले नाहीत. त्यांच्या सवयीप्रमाणं फक्त दाढीतून बोटं फिरवत बसले. थोडावेळ पसरलेली शांतता मला कशीतरीच वाटली. मग सर हेन्री एकदम म्हणाले,

‘नेव्हिली त्यावेळी प्रवासाला जाणार होता. तो कुठं जाणार होता, हे तुला माहीत आहे का ?’

मी चमकलो. सर हेन्रीनां एवढी माहिती कशासाठी हवी आहे हेच मला कळेना आणि केवळ काही दिवसांच्या परिचयावर नेव्हिलीबद्दल सर हेन्रींना काही सांगावं असंही मला वाटेना.

माझ्या मनातले विचार सर हेन्रींनी अचुक ओळखले असावेत. विचारमग्न चेहरा करून ते म्हणाले,

‘ॲलन, मी फाजील चौकशी करतोय, असं तुझ्या मनात आलं असेल. पण तसं नाहीय्. नेव्हिली माझा सख्खा भाऊ.’

मी दचकलोच आणि आश्चर्यानं म्हणालो,

‘तुमचा भाऊ ?’

‘होय ! नेव्हिली माझा सख्खा भाऊ आणि त्याच्याच शोधात आहे मी. आता तुम्हाला सांगायला हरकत नाही. पाच वर्षापूर्वीपर्यंत आमच्या दोघांचं नातं फारच चांगलं होतं. पण पुढं मात्र ते तसं राहीलं नाही. हे माझं दुर्दैव.’

‘का ? असं काय घडलं अचानक ?’ कॅप्टन गुडनं मधेच विचारलं.

सर हेन्रीनी एक मोठा निःश्वास टाकला आणि शांत स्वरात ते म्हणाले,

‘ती एक फार मोठी कहाणी आहे. पण त्याबद्दल मी फारसं सांगणार नाही.’

सर हेन्रींच्या केबीनमध्ये थोडावेळ शांतता पसरली. मी बराच अस्वस्थ झालो होतो. कारण सर हेन्री आता कोणतं रहस्य सांगणार याचे आराखडे मी मनातल्या मनात बांधत होतो.

कॅप्टन गुड सुध्दा अस्वस्थ झालेला दिसला. त्याच्या मनात काय असावं याचा अंदाज बांधणं फारस कठीण नव्हतं.

उजव्या डोळ्यावरचं भिंग तो उगाचच हातामध्ये काढून घेत होता आणि पुन्हा डोळ्यावर लावत होता.

आम्ही दोघही थोडेसे बुचकळ्यात पडलेले आहोत, हे सर हेन्रींनी ओळखलं. किंचित स्मित करुन ते आम्हाला म्हणाले,

‘माझी कहाणी ऐका तर ! पाच वर्षापूर्वीची गोष्ट असेल. माझ्या वडलांची प्रकृत्ती अचानक ढासळली. वास्तविक तसं त्यांना काहीच झालेलं नव्हतं. पण अचानक काही तरी बिघडलं खास.

'चांगल्या प्रकृतीचा वारसा मला माझ्या वडलांकडून मिळाला. माझे वडील एक मोठे व्यापारी होते. आयुष्यभर त्यांनी खूप कष्ट उपसले. अपरंपार पैसाही मिळविला.

'पण खूप पैसा मिळवून त्यांनी माणुसकी कधीच सोडली नाही. आल्यागेल्याचं ते नेहमीच स्वागत करत. नडलेल्या माणसाला मुक्त हातानं मदत करत. नाही तर मित्रांनो, पैसा ही मोठी भयंकर गोष्ट आहे. पैशामुळं माणसाचं जनावर होतं. माणसाची माणुसकी पैशामुळं संपते. माणूस अत्यंत क्रूर आणि निष्ठूर होतो तो पैशामुळंच. पैसा ही मोठी अद्भुत चीज आहे.'

कॅप्टन गुड हसला. त्याच्या हसण्यात अनेक भावनांच्या छटा होत्या. पण मी मात्र गंभीर झालो होतो. सर हेन्री यांच्याकडं स्थिर नजरेनं पहात मी म्हणालो,

'तुम्ही म्हणताय् ते खरं आहे. पैशाचा लोभ भयंकरच. पैशासाठी माणसं एकमेकांचा गळा कापायला मागेपुढे बघत नाहीत.'

'तू म्हणतोयस् तसं दुर्दैवानं आमच्याच घरी घडलं', सर हेन्री म्हणाले, 'पाच वर्षापूर्वी माझ्या वडलांची प्रकृती ढासळली आणि एके दिवशी शांतपणे त्यांनी या जगाचा निरोप घेतला. वास्तविक वडलांचं जे काही होतं, ते आम्हा दोघांचं होतं. वडलांनी दौलतही खूपच ठेवली होती. नेव्हिली आणि मी दोघंही पिढ्यान् पिढ्या सुखानं खाऊ शकू , इतका पैसा वडलांनी मागं ठेवला होता.

'पण दैवाच्या मनात काही वेगळच होतं. नेव्हिलीची बुध्दी पालटली. त्याला एकट्यालाच सगळा पैसा हवा होता. मी त्याची खूप समजूत घातली पण तो ऐकायला तयार नव्हता.

'वडलांनी मृत्यूपत्र केलेलं नव्हतं आणि आमच्या भागामधे असा नियम आहे की, मृत्यूपत्र नसेल तर, वडलांची सगळी दौलत थोरल्या मुलाला मिळते.

'मी थोरला. नेव्हिली धाकटा. सगळी दौलत माझ्याकडं आली. तरी सुध्दा त्यातला निम्मा वाटा मी नेव्हिलीला देणार होतो, पण तो मुळी ऐकायलाच तयार होईना.

'मग काय ? खडाजंगी उडाली. शेवटी माझ्या विनंतीचा मान न ठेवता, नेव्हिली केवळ अंगावरच्या कपड्यानिशी घराबाहेर पडला. एक फुटकी पेनीही बरोबर न घेता.

'मला अत्यंत वाईट वाटलं. पण काय करणार ? माणसाचा स्वभाव थोडाच

बदलता येतो ?'

टेबलावरचा पेला हेन्रीनी उचलून घेतला आणि सरबताचे दोन-तीन घुटके घेऊन ते म्हणाले,

'नेव्हिलीनं इंग्लंड सोडलं. घर सोडून तो बाहेर पडला, याचं एकमेव कारण म्हणजे पैसा. अर्थातच घरातून बाहेर पडल्यावर पैसा शोधणं आणि तो मिळवणं हेच त्याचं एकमेव ध्येय राहील.

'इंग्लंड सोडल्यावर तो थेट आफ्रिकेत आला. ॲलन, तुला माहीतच आहे की, आफ्रिकेत सोन्याच्या खाणी पुष्कळ आहेत. त्या सोन्याच्या आधारे लक्षाधीश होण्याचं स्वप्न मनात बाळगून नेव्हिली इथं आफ्रिकेत आला.

'तेव्हापासून नेव्हिलीचं काय झालं, तो कुठं गेला याचा आजपर्यंत मला पत्ता लागलेला नाही. त्याच्या शोधासाठीच इंग्लंड सोडून मी आफ्रिकेला आलो. माझ्या प्रयत्नात मला कॅप्टन गुडची फारच चांगली साथ लाभली आहे आणि ॲलन, केवळ दैवयोगानं तुझी माझी भेट झाली. नेव्हिली तुला भेटलेला असल्यामुळं त्याच्या शोधाची आशा माझ्या मनामध्ये पुन्हा एकदा जागी झाली आहे.'

पुन्हा काही वेळ शांततेत गेला. ओठावर आलेले माझे शब्द मोठ्या कष्टानं मी मागे ढकलले. कॅप्टन गुड आता चुळबुळ करत होता. सर हेन्रींनी त्यांच्या पेल्यातील सरबत संपवलं आणि हास्य करुन ते म्हणाले,

'ॲलन, तुझ्या मनात काही तरी आहे का ? पण ते सांगण्याचा तू संकोच करतोहेस. तुला अगदी मोकळेपणानं बोलायला काहीच हरकत नाही.'

मी स्वतःच्या मनाशी काही विचार केला. मग म्हणालो,

'हेन्रीसाहेब, तुम्हाला निराश करण्याची माझी इच्छा नाही, पण नेव्हिलीची आणि तुमची यापुढं कधीच भेट होणार नाही असं मला वाटतं.'

'पण का ? एक ना एक दिवस नेव्हिली मला नक्कीच भेटेल.'

मी नकारार्थी मान हलवली.

'तुमचा नेव्हिली अशा जागी गेलाय् की, तिथून माणसं कधीही परत येत नाहीत आणि चुकून आलीच तर येतात ती फक्त प्रेत.'

सर हेन्रींनी माझ्याकडं चमकून पाहीलं. ते म्हणाले,

'म्हणजे ? काय म्हणायचय् काय तुला ?'

'सर हेन्री, मला सांगायला वाईट वाटतं, पण मी जे सांगतोय् ते खरंच आहे.

तुमचा नेव्हिली सॉलोमनच्या खजिन्याकडं गेलाय.'

माझं वाक्य पुरं होत न् होतं, तोच कॅप्टन गुड आणि सर हेन्री ताडकन् उठून उभे राहीले आणि एकदम किंचाळले,

'काय ? सॉलोमनच्या खजिन्याकडं ?'

मी खिशातला पाईप बाहेर काढला. हातानं खूण करूनच त्या दोघांना खाली बसायला सांगितलं. पाईपमध्ये तंबाखू भरली. काडीनं ती शिलगावली आणि धूर तोंडाबाहेर टाकत म्हणालो,

'मी सांगतोय् यातलं अक्षर न् अक्षर खरं आहे. नेव्हिली खरंच सॉलोमनच्या खजिन्याकडं गेलाय्.'

सर हेन्रीनी सुध्दा त्यांचा पाईप पेटवला आणि संथ स्वरात ते म्हणाले,

'सॉलोमनचा खजिना काय ? हा आहे तरी कुठं ?'

'माझी माहिती सुध्दा ऐकीवच आहे.'

'असू दे, असू दे ! तुला जेवढी माहिती आहे, मग ती ऐकीव का असेना, आम्हाला सांग', कॅप्टन गुड म्हणाला.

'ऐका तर मग. सॉलोमनच्या खजिन्याबद्दल ऐकलं ते लहानपणी. पण त्यावेळेपासून माझ्या मनात एक गूढ निर्माण झालंय्.

'मी लहान असताना एका शिकाऱ्यानं मला ही माहिती सांगितली, सॉलोमनच्या खजिन्याबद्दल. दर्बानच्या वायव्येला, कुठंतरी डोंगरामध्ये सॉलोमनचा खजिना आहे.

'दर्बानच्या वायव्येला आपण प्रवास करायला लागलो की, वाटेमधे कालुकावे या नावाची मोठी नदी लागते. त्या नदीच्या ऐलतीरावर सिटांडाची एक मोठी झोपडी आहे. आपला प्रवास सॉलोमनच्या खजिन्याच्या दिशेने अचुक होत असल्याची ती एक खूण आहे.

'पण कालुकावे नदी ओलांडली की, एक प्रचंड वाळवंट लागतं, या वाळवंटातून कित्येक मैलांचा प्रवास करायचा म्हणजे एक भयानक दिव्य आहे. कारण या वाळवंटामधे पाणथळाची फक्त एकच जागा आहे आणि ती सुध्दा त्या भागातल्या जाणकारांनाच माहीत आहे. दुर्दैवानं वाळवंटामधे जर कुणी रस्ता चुकला, तर मृत्यूशिवाय त्याच्या वाट्याला काही येत नाही. कारण खाली असते भयानक तापलेली वाळू आणि डोक्यावर असतं रणरणारं ऊन.'

मी मधेच समोर पाहिलं. समाधी लागल्याप्रमाणं कॅप्टन गुड आणि हेन्री सॉलोमनच्या खजिन्याबद्दल ऐकत होते.

'सर हेन्री, तुमचा नेव्हिली या वाळवंटाच्या तडाख्यात सापडला नसेल अशी अपेक्षा आपण करुया. वाळवंटातली पाणथळाची जागा सापडली की मग मात्र प्रवासाला वाळवंटाचा धोका नाही, कारण पाण्याचा भरपूर साठा करुन त्याला पुढं जाता येतं.'

'म्हणजे हे वाळवंट ओलांडलं की, आपण सॉलोमनच्या खजिन्याजवळ येतो', कॅप्टन गुडअधीरपणे म्हणाला.

मी मोठ्यानं हसलो. म्हणालो, 'कॅप्टन साहेब, इतकं सोपं नाहीय् ते. आता कुठं आपल्या प्रवासाला सुरवात झाली. सॉलोमनचा खजिना तर खूपच लांब आहे. वाळवंट ओलांडलं की, आपल्याला आडवी येते ती प्रचंड डोंगरांची रांग. या डोंगरांना म्हणतात, शिबाचे डोंगर.'

'म्हणजे ? शिबाचे डोंगर म्हणजे काय ?' कॅप्टन गुडनं पुन्हा विचारलं.

'सॉलोमन राजा हा जगात सगळ्यात शहाणा पुरुष समजला गेलाय्. पण त्याची बायको, शिबा, ही सुध्दा अत्यंत चतुर, मुत्सद्दी आणि हुशार स्त्री इतिहासामधे विख्यात आहे.

'शिबाच्या डोंगराआधी ओलांडावे लागतात ते सुलीमानचे डोंगर. हे डोंगर आपण ओलांडले की, त्या पुढं आपल्याला शिबाचे डोंगर लागतात. हे डोंगर अत्यंत कठीण आहेत.'

'का ?' कॅप्टन वुडन एकदम विचारलं.

'त्याचं कारण अगदी उघड आहे. शिबाच्या डोंगरांची रांग अधिक लांब आहे. सगळ्या डोंगररांगेत भयानक गर्द जंगल आहे आणि तिथं सारखा पाऊस कोसळत असतो.'

कॅप्टन गुडनं एक मोठा सुस्कारा सोडला. उजव्या डोळ्यावरील भिंगाशी चाळा करीत तो म्हणाला,

'एकूण हे प्रकरण महाभयंकर दिसतंय् !'

सर हेन्रींनी त्यांच्या सवयीप्रमाणं दाढीतून बोटं फिरवली आणि मला विचारलं,

'अॅलन, एकदा का हा डोंगर ओलांडला, की आपण निश्चितच सॉलोमनच्या खजिन्याजवळ पोचतो.'

'मुळीच नाही', मी म्हणालो, 'शिबाचे डोंगर आपण एकदा ओलांडले की, आपल्याला झुलू जमातीचं राज्य लागतं. रानरेड्यांच्या ताकदीचे हे लोक अत्यंत शूर आहेत. पण तितकेच अंधश्रध्द. विश्वास बसला तर त्यांच काळीज तुम्हाला काढून देतील. पण तुमचं त्यांच्याशी जमलं नाही तर मात्र, तुम्हांला काळजासह कच्चं खायला कमी करणार नाहीत.'

सर हेन्रीचा चेहरा आता चिंताग्रस्त दिसत होता. ते मला म्हणाले,

'आणि अशा भागामधे सॉलोमनच्या खजिन्याचा शोध घेण्यासाठी माझा वेडा नेव्हिली गेलाय्.'

पण नेव्हिलीचा विचार कॅप्टन गुडच्या मनातून बहुधा गेला असावा. तो उत्सुकतेनं म्हणाला,

'पण हा खजिना कुठाय् ?'

'एकदा का आपण या झुलू जमातीचं राज्य ओलांडलं की, पुढं कुठंतरी दूरवर प्रचंड डोंगरामधे तीन चेटकिणींच्या पहाऱ्यात सॉलोमन राजाचा खजिना लपला आहे.'

सर हेन्री आणि कॅप्टन गुड, दोघंही पुन्हा एकदा विचारात गढल्यासारखे दिसले. मी म्हणालो,

'झुलूंच्या राज्याला कुकुआना असं नाव आहे. त्या लोकांना तरी सॉलोमनच्या खजिन्याची माहिती असेल की नाही कोणास ठाऊक ?'

सर हेन्रींनी त्यांच्या पेल्यातलं सरबत पुन्हा संपवलं आणि ते मला म्हणाले,

'सॉलोमनच्या खजिन्याकडचा हा सगळाच प्रवास एकूण महाभयंकर आहे. यात शंकाच नाही. पण तू मला नेव्हिलीबद्दल, माझ्या लाडक्या भावाबद्दल, सांगत होतास. त्याचं काय ?'

'सर हेन्री, मी तुम्हाला ही सगळी माहिती सांगितली ती ऐकीव आहे. कारण त्यावेळी मी खूपच लहान होतो. पण ही हकीगत ऐकून लहानपणापासून माझ्या मनात अत्यंत कुतुहल जागलेलं आहे. सिटांडा या ठिकाणी असलेल्या खेड्याबद्दल मी तुमच्याशी बोललो आहे. तिथं मला एक तगडा आणि उंचापुरा मनुष्य भेटला. त्याचं नाव होतं जोझ सिल्व्हेस्टर.'

'हा कोण होता ?' कॅप्टन गुडनं अचानकपणे विचारलं.

'पोर्तुगालमधून आलेला हा प्रख्यात प्रवासी. त्याच्या धाडसाबद्दल मी

अनेकांकडून ऐकलेलं होतं. त्याला सॉलोमनच्या खजिन्याची ओढ लागलेली होती. सगळं वाळवंट ओलांडून अगदी सहजपणे सॉलोमनच्या खजिन्यापर्यंत पोहचण्याची त्याला खात्री होती. सॉलोमनचा खजिना जिंकून जगातील सर्वात श्रीमंत होण्याची स्वप्नं तो पहात होता.'

'मग ? त्याला खजिना सापडला ?' कॅप्टन गुडनं विचारलं.

'नाही', मी म्हणालो, 'पंधरा दिवसानंतर सिल्व्हेस्टर पाय फरपटत माघारी आला. त्याची अक्षरशः दशा झाली होती. कपडे फाटलेले, दाढी वाढलेली, एवढा राक्षसासारखा त्याचा तगडा देह. पण आता तो हाडाच्या सापळ्यासारखा दिसत होता. त्याच्या वाळलेल्या शरीराला आधार देऊन मी त्याला तंबूत आणलं. तो इतका थकला होता की, दोन पावल टाकण्याची ताकदही त्याच्या अंगात उरली नव्हती. तंबूत आल्याबरोबर तो खाली कोसळला. माझ्या लक्षात आलं की डॉक्टरांना बोलावून सुध्दा काही उपयोग नव्हता. सिल्व्हेस्टर आता काही क्षणाचाच सोबती उरलेला आहे. त्याच्या मानेला आधार देऊन मी सिल्व्हेस्टरला बसतं केलं आणि त्याला थोडं पाणी पाजलं. तो अक्षरशः धापा टाकत होता. पाण्याचे काही घोट त्याच्या घशाखाली कसेबसे उतरले. त्याच्या सापळ्यासारख्या झालेल्या देहाकडं बघून मला भडभडून येत होतं. आपले वाळलेले हात उचलून तो क्षीण स्वरात म्हणाला,

'ॲलन, मी संपलो. सॉलोमनच्या खजिन्याच्या मोहानं मी प्रवास केला खरा, पण वाळवंटातील महाभयंकर पिवळ्या रोगानं मला वाटेत गाठलं. माझी दशा झाली. नशीब एवढंच की, मी निदान तुझ्यापर्यंत जिवंत तरी परत येऊ शकलो.'

एवढं बोलतानाही सिल्व्हेस्टरला भयंकर यातना होत होत्या. त्याचे खोल गेलेले डोळे चमत्कारिक दिसत होते. आवाज क्षीण झाला होता. मी त्याला पुन्हा थोडंपाणी पाजलं. लटलटत्या हातानं त्यानं खिशातून एक जुना कागद बाहेर काढला. माझ्या हातात तो कागद ठेवत सिल्व्हेस्टर म्हणाला,

'ॲलन हा- सॉलोमनच्या खजिन्याकडं --- जाण्याचा --- नकाशा आहे.--- हा --- तुझ्याकडं ठेव आणि---' पण पुढचे शब्द तो बोलूच शकला नाही. त्याची मान कलंडली. हात जमिनीवर आपटले आणि त्यानं शेवटचा श्वास घेतला.'

'बापरे ! म्हणजे पिवळ्या तापानं सिल्व्हेस्टरचा बळी घेतला तर !' कॅप्टन गुड किंचाळला.

'आणि माझा भाऊ असल्या भयानक भागात गेला आहे तर !' सर हेन्री उदासपणे म्हणाले.

मी काहीच बोललो नाही. पण नेव्हिली सॉलोमनच्या खजिन्याकडं गेलेला आहे याबद्दल स्वतः सर हेन्री यांची खात्री झालीच होती. तरी सुध्दा माझ्याच तोंडून ते काढून घेण्यासाठी त्यांनी मला पुन्हा एकदा विचारलंच,

'मग ? नेव्हिली या खजिन्याच्या शोधाला गेलाय् म्हणतोस ?'

मी सुध्दा एकेका शब्दावर जोर देत म्हटलं,

'सर हेन्री, तुमचा भाऊ नेव्हिली सॉलोमनच्या खजिन्याकडंच गेलेला आहे. यावद्दल माझ्या मनात अजिबात संशय नाही. कारण, सिल्व्हेस्टरला तो भेटलेला होता.'

मधेच वाजलेल्या बोटीच्या कर्कश भोंग्यामुळे आम्ही सगळेच दचकलो. पण नेव्हिली सॉलोमनच्या खजिन्याकडं गेलेला आहे हे सत्य जणू तो भोंगा आम्हाला सांगत होता.

सर हेन्रींनी मला हळूच विचारलं,

'सिल्व्हेस्टरनी तुला दिलेला नकाशा अजूनही तुझ्या जवळ---'

'माझ्या जवळच आहे', मी म्हणालो आणि क्षणार्धात माझ्या खिशातला नकाशा मी टेबलावर पसरला.

कॅप्टन गुड आणि सर हेन्री यांनी त्या नकाशाचं बराच वेळ निरीक्षण केलं. कॅप्टन गुड तर अगदी खूष झालेला होता. जणू काही सॉलोमनचा सगळा खजिना ''शाताच त्याच्या हातात आलेला होता. सर हेन्री मात्र विचारात गढले होते. काही क्षणानंतर ताडकन् उठून ते गरजले,

'नेव्हिली, तुझ्या शोधासाठी मी आलोच. तू कितीही अडचणीत असलास तरी मी तुला सोडवेनच आणि सॉलोमनचा खजिना जिंकून दाखवेन सगळ्या जगाला.'

सर हेन्री भावनाविवश होऊन बोलत होते. त्यांना सावध करणं हे माझं कर्तव्य होतं. म्हणूनच मी पटकन म्हणालो,

'सर हेन्री, तुमचं हे म्हणणं वेडेपणाचं आहे. सॉलोमनच्या खजिन्याकडं जाणं म्हणजे मृत्यूच्या ओठावरुन चालण्यासारखं आहे.'

पण सर हेन्री जराही विचलीत झाले नाहीत. उलट त्यांचा चेहरा अधिकच निश्चयी दिसला. ते मला म्हणाले,

'ॲलन, वेडी धाडसं मला आवडतात. कारण माझा स्वभावच धाडसी आहे. शिवाय इतकी माहिती कळल्यावर, नेव्हिलीचा शोध न घेता मी घरीच बसलो तर परमेश्वर मला कधीही क्षमा करणार नाही आणि या कॅप्टन गुडकडं बघ तरी जरा, उत्साहानं कसा फुरफुरलाय् !'

खरं तर सर् हेन्रीना नकार द्यायचा असं मी मनाशी ठरवलं होतं. पण मला ते शक्यच झालं नाही. कदाचित्, सॉलोमनच्या खजिन्याचं आकर्षण माझ्याही मनात जबरदस्त असावं. त्यामुळे मी पटकन् बोलून गेलो,

'आपण हे वेडं धाडस करायचंच. सॉलोमनचा खजिनाही आपण जिंकू या आणि नेव्हिलीचाही शोध घेऊया.'

माझे शब्द ऐकून कॅप्टन गुडला इतका आनंद झाला की हवेतल्या हवेत कोलांटी उडी मारुन तो ओरडला,

'हुर्रेऽऽ !'

आता मला जाणवलं. आपण होय तर म्हटलंय्. पण खरं अग्निदिव्य तर पुढंच आहे.

***

## २. उम्बोपाचं गूढ

आमचं डंकेल्ड जहाज दर्बानला पोचलं त्यावेळी आमच्या उत्साहाला सीमा नव्हती. 'सॉलोमनचा खजिना' या दोन शब्दांनी आम्ही झपाटल्यासारखे झालो होतो.

आमच्या डोळ्यापुढं गुहेतला खजिना नाचत होता. त्या खजिन्यात असलेल्या हिऱ्यांच्या तेजानं स्वप्नातही आमचे डोळे दिपत होते. कॅप्टन गुड तर झोपेतही सॉलोमनच्या खजिन्याबद्दल काय वाट्टेल ते बरळत होता.

सर हेन्री त्या मानानं शांत होते. पण तरी सुध्दा त्यांच्या मनात खूपच खळबळ माजलेली होती, हे त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं.

माझी अवस्था मात्र आता चमत्कारिक झाली होती. सॉलोमनच्या खजिन्याकडं जायचा प्रवास किती खतरनाक आहे हे फक्त मलाच माहीत होतं. त्या खजिन्यापर्यंत सुखरूप पोचायचं, खजिना मिळवायचा आणि पुन्हा परत यायचं, हे काम सोपं नव्हतं. त्याशिवाय कॅप्टन गुड आणि सर हेन्री या दोघांची जबाबदारी आता अप्रत्यक्षपणे माझ्यावर होती. माझ्या मनावरचं दडपण त्यांना दिसू नये म्हणून मी आटोकाट प्रयत्न करत होतो.

दर्बानमधे आल्यानंतर कॅप्टन गुड आणि सर हेन्री यांना मी माझ्या घरी घेऊन गेलो. तिथंच आम्ही आमच्या अवघड प्रवासाची तयारी करण्यास सुरवात केली.

नोकराच्या मदतीनं प्रवासासाठी लागणाऱ्या सगळ्या गोष्टी मी खरेदी केल्या. त्यात अनेक वस्तू होत्या. दारुगोळा, बंदुका, पिस्तुलं, तंबू आणि राहुटीचं साहित्य, खिळे, रंग, दुर्बिणी, पाणी साठवण्याच्या वस्तू, एक ना दोन--- अनेक वस्तू आम्ही

बरोबर घेतल्या.

सर हेन्री आणि कॅप्टन गुड आता झपाटल्यासारखे झाले होते. दररोज ते दोघंही सॉलोमनच्या खजिन्याच्या नकाशाचं तासन् तास निरीक्षण करत बसत असत. कॅप्टन गुड आम्हाला अनेक सूचना करायचा.

कॅप्टन गुडला डोळ्यासमोर दिसत होता तो सॉलोमनचा खजिना. सर हेन्रींना सॉलोमनच्या खजिन्याची ओढ तर होतीच, पण त्यांच्या हरवलेल्या भावाला परत आणायची स्वप्नं ते पहात होते. हे सगळं अवघड प्रकरण सांभाळण्याची जबाबदारी माझी.

प्रवासाला जाण्यासाठी आता फक्त एकच दिवस उरला. सगळ्या सामानाची आम्ही बांधाबांध केली. कॅप्टन गुड आनंदानं उड्याच मारत होता.

आदले दिवशी घोडागाडीत मी सामान भरत असताना काही विलक्षण घडलं. रायफल भरलेली पेटी मी गाडीत ठेवत होतो. एवढ्यात एक काळीकभिन्न सावली माझ्या अंगावर पडली.

एक उंचापुरा, तगडा मनुष्य माझ्यासमोर उभा होता. त्याची उंची साडेसहा फूट तरी नक्कीच होती. उजव्या खांद्यावरुन कमरेपर्यंत त्यानं वाघाचं कातडं पांघरलं होतं. त्याच्या गळयात हाडांची माळ होती.

त्याचा देह काळाकभिन्न असला तरी, त्याचा बांधा अतिशय रेखीव असा होता. त्याचे खांदे रूंद आणि बळकट असे होते. किंचित घाम आलेली त्याची छाती लोखंडी शिळेप्रमाणं दिसत होती. त्याचे हात इतके लांब होते की, जवळ जवळ त्याच्या गुडघ्याला स्पर्श करत होते.

तो उत्तम धावपटू असला पाहिजे हे माझ्या लक्षात आलं. कारण त्याच्या मांड्या आणि पोटऱ्या टणक आणि पिळदार दिसत होत्या.

त्याचे दंड स्नायूंनी फुगलेले होते. त्या दंडात जबरदस्त ताकद असावी. एखादा काळा पुतळा ओतावा तसा त्याचा देह माझ्यासमोर उभा होता.

त्या माणसाचा रंग काळा असला तरी, त्या काळेपणाला सुध्दा एक प्रकारची झळाळी होती. त्याचा काळा रंगही उजळ असावा असं मला वाटलं.

तो झुलू जमातीचा आहे हे माझ्या ताबडतोब लक्षात आलं. कारण झुलू जमात वापरते, तसा दंड त्याच्या हातात होता.

मी त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिल्यावर तो किंचित हसला. त्याचे शुभ्र

दात चकाकले. आपल्या हातातील काठी किंचित उंचावून, मला अभिवादन करत तो म्हणाला,

'माझं नाव उम्बोपा आहे- मला कळलयं् की, तुम्ही उत्तरेकडच्या प्रवासाला निघालेले आहात. हे खरं आहे का ?'

माझ्या मनात एकदम संशय दाटला. कारण आमच्या प्रवासाची वार्ता आम्ही अगदी गुप्त ठेवलेली होती.

उम्बोपावर धारदार नजर रोखत मी म्हटलं,

'काय म्हणालास तू ?'

'हे गोऱ्या माणसा, मला नक्कीच कळलयं् की, तुम्ही प्रवासाला जाणार आहात.'

'असेलही, पण तुला काय करायचंय् ?'

'मला तुमच्या बरोबर यायचंय्. प्रवासात मी तुम्हाला साथ देणार आहे.'

'पण तू कोण आहेस ? आम्हाला तर तुझ्याबद्दल काहीच माहिती नाहीय्', मी त्याच्याकडं संशयानं पहात म्हणालो.

उम्बोपानं त्याच्या व्यक्तिमत्त्वाची छाप माझ्यावर नक्कीच टाकलेली होती. कारण माझ्या लहानपणापासून मी अनेक झुलू लोक पाहिलेले होते. ते बहुतेक सगळे गलिच्छअसत. खऱ्या अर्थानं मानवी संस्कृतीचा स्पर्श त्यांच्या आयुष्याला कधी झालाय् असं वाटायचंच नाही. सभ्याचार तर त्यांच्याजवळ नसतच.

या तुलनेत माझ्यासमोरचा मनुष्य अगदी वेगळा होता. त्याची रहाणी स्वच्छ दिसत होती. तो माझ्याशी अगदी आदबीनं बोलत होता. अगदी गोरी माणसं-परस्परांशी बोलतात तसं !

आमचं संभाषण झुलू भाषेतच चाललेलं होतं. कारण झुलू भाषा मला अगदी उत्तम अवगत होती. आमचं संभाषण ऐकून एव्हाना कॅप्टन गुड आणि सर हेन्री आमच्या जवळ आले होते. माझ्या प्रमाणंच ते दोघंही उम्बोपाकडं संशयानं बघत होते. उम्बोपा काय म्हणतोय् हे इंग्रजी भाषेमधे मी दोघांनाही सांगितले. हे ऐकल्यावर कॅप्टन गुड भयंकर उखडलाच. तो किंचाळला,

'मुळीच नाही, या झुलूला आपण आपल्याबरोबर मुळीच न्यायचं नाही.'

मी सर हेन्रींच्याकडं पाहिलं. त्यांनी त्यांचे खांदे किंचित उडवले आणि म्हटलं,

'कोणास ठाऊक ? असली माणसं भरवशाची असतात की नाही !'

मी उम्बोपाकडं पाहिलं, तो एखाद्या पुतळ्याप्रमाणं निश्चल उभा होता. मी

विचारलं,

'उम्बोपा तू कुठला ? कोणीकडून आलास ? आमच्या प्रवासाबद्दल तुला कसं कळलं ?'

उम्बोपा हसला. म्हणाला,

'तुम्ही तर मला एकदम फार प्रश्न विचारले. पण तुम्हाला उत्सुकता असलीच तर माझी हकीगत तुम्हाला थोडक्यात सांगतो.'

उम्बोपाची कथा, आम्ही सगळेजण लक्ष देवून ऐकू लागलो. उम्बोपा म्हणाला,

'माझी कथा तशी फारशी मोठी नाही आणि रस वाटावा अशीही नाही. मी झुलू आहे. पण एका दृष्टीनं झुलू नाहीही. माझ्याकडे असे चमत्कारिक नजरेनं बघू नका. झुलू जमातीत मी जन्माला आलो असलो तरी, झुलू जमातीमधे मी फार वर्षे वाढलो नाही. माझ्या आयुष्याचा प्रवास वेगळाच झाला.

'मी दर्बानकडे आलो ते उत्तरेकडूनच. या दक्षिण आफ्रिकेच्या परिसरात खूपच हिडलो. आता मला असं वाटायला लागलय् की, उत्तरेकडे पुन्हा परत जावं. आता इथल्या शहरी जीवनाचा मला कंटाळा आलेला आहे.

'उत्तरेकडचा सगळा भाग मला चांगला माहित आहे. तिकडच्या मातीचा कणन् कण मी ओळखतो. मी बरोबर असल्यावर तुम्हाला प्रवासात कोणतीच अडचण येणार नाही. मला तुमच्याबरोबर प्रवासाला यायला आवडेल. तुम्हालाच माझं येणं पटतय् की नाही ते पहा.'

उम्बोपाचं सगळं कथन झुलू भाषेत होतं. त्या सगळ्या शब्दांचं मी इंग्रजीत भाषांतर केलं. झुलू भाषा कळत नसूनही सर हेन्री आणि कॅप्टन गुड दोघंही लक्षपूर्वक ऐकत होते. उम्बोपाच्या म्हणण्याचा आशय त्यांच्या लक्षात आला असावा.

मी भाषांतर केल्यावर त्यांना सगळीच हकीगत कळली.

सर हेन्री उम्बोपाला निरखून बघत होते. माझ्या अचानक लक्षात आलं की, उम्बोपाच्या गळ्यातील माळ हाडांची नसून सिंहाच्या नखांपासून बनवलेली आहे. उम्बोपाच्या उमद्या व्यक्तीमत्त्वाचा परिणाम सर हेन्री यांच्यावरही झाला असावा. त्यांनी विचारलं,

'आम्ही तुझ्यावर विश्वास कसा ठेवावा ?'

'माझा शब्द हाच माझा विश्वास,' उम्बोपा शांत स्वरात म्हणाला, 'मी झुलू आहे

आणि झुलू माणसं कधीही खोटं बोलत नसतात.'

सर हेन्रींनी काही क्षण विचार केला. त्यांच्या सवयीप्रमाणं दाढीतून बोटं फिरविली. नंतर ते म्हणाले,

'तुझ्या शब्दांवर विश्वास ठेवण्यापूर्वी मला माझ्या मित्रांबरोबर बोललं पाहिजे.'

काहीही उत्तर न देता उम्बोपानं फक्त खांदे उडवले. इतक्यात कॅप्टन गुड म्हणाला,

'हे दोघं कसे दिसतात नाही ? उम्बोपा आणि हेन्री !'

'कसे दिसतात ?' मी कुतुहलानं विचारलं.

'दोन माजलेल्या हत्तींसारखे दिसताहेतं ते', खळाळून हसत कॅप्टन गुड म्हणाला.

सर हेन्रीनी तोपर्यंत मनाशी काही पक्का विचार केलेला होता. उम्बोपाला न्याहाळत त्यांनी जरबेच्या स्वरात म्हटलं,

'आम्ही तुला आमच्या बरोबर नेऊ. पण याद राख. जर काही गडबड केलीस तर गोळी घालीन आणि एक लक्षात ठेव. तुला माझ्याबरोबर नोकर म्हणूनच यावं लागेलं.'

सर हेन्रीनी जे काही म्हटलं त्याचा आशय उम्बोपाच्या लक्षात आला असावा. कारण मी काही बोलण्याच्या अगोदर तो झुलु भाषेत पटकन् म्हणाला,

'ठीक आहे. मला मान्य आहे.'

'दुसऱ्या दिवसी प्रवासाला निघायचं हे नक्की झालं. रात्री उशिरापर्यंत आम्ही सामानाची बांधाबांध करत होतो. अशा कामात उम्बोपा तरबेज असावा. कारण त्याच्या वाट्याला आलेली सर्व कामं त्यानं झपाट्यानं आणि एकही चूक न करता पार पाडली.

माझ्या प्रमाणच सर हेन्री सुध्दा त्याच्याकडे बारकाईनं पहात होते. उम्बोपाच्या वागण्यात काही सशंयास्पद नाही ना, याकडं ते बारकाईनं पह‌ात होते.

सकाळी आम्ही लवकर उठलो. मी तसा देवभोळा नाही. पण त्या दिवशी मात्र मी मनापासून देवाची प्रार्थना केली. कारण ज्या प्रवासाला आम्ही निघालो होतो, तो प्रवास मृत्यूच्या जबड्यातून करायचा होता, याची मला पूर्ण कल्पना होती.

सूर्यानं पहिला किरण माझ्या घरावर टाकण्यापूर्वी आम्ही एका अजब प्रवासाला निघालो. सॉलोमनच्या खजिन्याचा शोध घ्यायला. तो जानेवारीचा महिना

होता. नक्की तारीख आता मला आठवत नाही, पण जानेवारीचा तो शेवटचा आठवडा होता.

जानेवारीपासून मे महिन्यापर्यंतचा आमचा प्रवास जवळजवळ हजार मैलांचा झाला. या प्रवासानं आम्ही थकून गेलो. पण उम्बोपा किती चिवट आणि तगडा गडी आहे, हे या प्रवासानं सिध्द झालं. जराही न थकता, न दमता तो तासन् तास एकाच गतीनं चालत असे.

वाटेत आम्ही कंटाळलो, तर आम्हाला पुन्हा प्रेरणा मिळावी म्हणून तो निरनिराळ्या गंमती करायचा.

प्रवास करत करत शेवटी आम्ही वाळवंटाच्या काठावर पोहोचलो. एखाद्या महासागराप्रमाणं अवाढव्य वाळवंट आमच्या डोळयापुढं पसरलं होतं. कॅप्टन गुडनं त्या वाळवंटाकडं डोळे विस्फारून पाहिलं. ते भयंकर वाळवंट पार कसं करायचं, हा भाव जणू त्याच्या डोळ्यांमध्ये होता. उम्बोपानं ते ओळखलं आणि तो मोठ्यानं हसला.

सूर्यास्ताची वेळ झालेली होती. समोरचं क्षितीज लालबुंद झालेलं होतं. त्या लालबुंद क्षितीजावर सुलीमानचे डोंगर लांबवर अस्पष्ट दिसत होते. उम्बोपानं त्या डोंगराकडं निरखून पाहिलं. सर हेन्री एकटक सुलीमानच्या डोंगराकडं पहात होते. मी सुलीमानच्या डोंगराकडं बोट दाखवत म्हटलं,

'हेच डोंगर ओलांडून आपल्याला पलीकडं जायचंय्.'

सर हेन्रीनी एक सुस्कारा टाकला. ते म्हणाले,

"माझा भाऊ कदाचित तिथेच असेल. आपण त्याला शोधून काढूया.'

उम्बोपा झुलू भाषेत म्हणाला,

"त्या डोंगराच्या जवळचा सगळाच भाग विचित्र आहे. त्या डोंगरामधून एक पांढऱ्या रंगाची सडक जाते. फार लांबलचक वाट आहे ती. त्या वाटेनं गेल्यावर कदाचित, सॉलोमनचा खजिना मिळेलही.'

मी उम्बोपाकडं चमत्कारीक नजरेनं पाहिलं. हा मनुष्य वाटतो तितका साधा नव्हे, याला बरीच माहिती असावी, असं मला वाटलं. माझ्या चेहऱ्यावर उमटलेले भाव उम्बोपानं अचूक ओळखले असावेत. तो गंभीरपणे म्हणाला,

'तुम्हाला काळजी करायचं काही कारण नाही. या भागाची जेवढी माहिती मला आहे, तेवढी मी तुम्हाला सांगेन. डोंगर ओलांडून आपण पलिकडं गेलो की, बरंच

काही सुकर होईल. पण डोंगरातल्या लोकांना वाटतं की, डोंगराच्या टोकावर मृत्यूच बसलाय.'

एवढं बोलून उम्बोपा पुढं चालायला लागला. त्याला बघून सर हेन्री म्हणाले,

'मोठा चमत्कारिकच मनुष्य दिसतो हा.'

मी काहीच बोललो नाही. जवळ जवळ हजार मैलांचा प्रवास करुन मी थकलो हातो आणि माझे साथीदारही.

त्यामुळंच वाळवंटाच्या काठावर पोचल्यानंतर दुसरा संपूर्ण दिवस आम्ही पूर्ण विश्रांती घेतली. वाळवंटातला प्रवास कसा करायचा, याची निश्चित योजना आम्ही एकमेकाशी चर्चा केल्यावर ठरवली. आमच्या वाळवंटातल्या प्रवासाचं एक सूत्र नक्की होतं आणि ते म्हणजे, प्रवास फक्त रात्री करायचा.

रात्र झाल्यावर आमच्या योजनेप्रमाणं आम्ही प्रवासाला निघालो. एक प्रकारची चमत्कारिक ओढ आमच्या मनात निर्माण झाली होती.

दिवसा तापलेली वाळू, आता थंड झालेली होती. इतकंच काय, पण चांदण्याखाली नहात असलेल्या वाळवंटात कडाक्याची थंडीही वाजत होती. सूर्य प्रकाशात तापणारं आणि भयंकर असणारं ते वाळवंट चंद्रप्रकाशात मनाला भुरळ पडावी, इतकं सुंदर दिसत होतं.

अंगात उबदार कपडे घालून आम्ही निघालो. उम्बोपानं फक्त एक जाड रग त्याच्या अंगाभोवती गुंडाळला होता. त्या चंद्रप्रकाशात उम्बोपा एखाद्या दगडी पुतळ्या प्रमाणं दिसत होता.

शीतल चंद्रप्रकाशामधे कसल्यातरी सुगंधानं सगळं वातावरण भरून गेलं होतं. रात्रीच्या निरव शांततेत वाळूवर पडणाऱ्या पावलांचे आवाज फारच मोठे वाटत होते.

सर हेन्रींची नजर, दूरवर सुलीमानच्या डोंगरांचा शोध घेत होती. आजुबाजूच्या वातावरणाचा परिणाम कॅप्टन गुडवर झाला असावा. कारण मंतरल्याप्रमाणं तो आमच्यामागून येत होता.

दुसरा दिवस उजाडला आणि आमच्या दमलेल्या शरीरांनी वाळवंटात बैठक मारली. जागा मिळाली तिथंच आम्ही राहुट्या उभारल्या.

ऊन चढत गेलं, तसं वाळवंटाचं भयानक रौद्र स्वरुप आम्हाला दिसायला लागलं. आदल्या रात्रीची शांतता, शीतलता आणि आल्हाददायकता कुठल्या कुठं

पळून गेली होती.

चहुबाजूनी रान पेटावं तसं झालं होतं. घोंगावणारे वारे कानात दडे बसवत होते. उसळणाऱ्या वाळूचे कण आमच्या तोंडावर फटाफट येऊन आदळत होते. वाऱ्याच्या लाटा इतक्या गरम होत्या की, तापलेल्या भट्टीत घालावं, तसं आम्हाला झालं होतं.

निसर्गाचं ते रौद्र तांडव बघून आम्ही चकीत झालो होतो. मधेच वाळवंटात चक्री वादळ पिंगा घालत होतं. आमचे घसे कोरडे पडले होते. तोंड शुष्क झालं होतं. पण पाण्याचा साठा आमच्याकडं फार नव्हता. म्हणूनच किमान पाणी पिऊन हा वाळवंटाचा प्रवास करायचा हे अगोदर ठरलं होतं.

सूर्य पश्चिमेकडं झुकायला लागला. वाळवंटाचं उग्र रूप पाहून आम्ही अंतर्मुख झालेलो होतो. असल्या भयंकर वाळवंटातून केवळ मूर्ख माणसंच प्रवास करतील अशी चमत्कारीक भावना आमच्या मनात आली होती. तरीपण आपल्या मनातील भाव एकमेकांना कळू नयेत म्हणून आम्ही खबरदारी घेत होतो.

रात्र झाली आणि वाळवंटात पेटलेल्या अग्नीज्वालांचं थैमान संपलं. हळूहळू निरव शांतता वाळवंटात पसरली. आमचा हरवलेला उत्साह आम्हाला पुन्हा परत मिळाला. नव्या उमेदीनं आम्ही प्रवासाला निघालो. पण निघण्यापूर्वी घोटभर पाणी प्यायला विसरलो नाही.

वाळवंटातील या प्रवासात उम्बोपाची ताकद पुन्हा एकदा लक्षात आली. आमच्यातील सगळ्यात जास्त पाणी प्यायचा तो कॅप्टन गुड आणि उम्बोपाला मात्र पाणी जवळ जवळ लागायचंच नाही.

असे काही दिवस आणि रात्र आमचा प्रवास चालूच होता. पाय तुटून पडायची पाळी आली तरी रात्री जास्तीतजास्त अंतर कापायचा आमचा प्रयत्न असे. कारण प्यायचं पाणी जवळ जवळ संपत आलय् हे आम्हाला स्पष्ट दिसत होते.

वाळवंटात असे आम्ही कितीतरी दिवस काढले. अजून किती वाळवंट तुडवायचं याचा अंदाज आम्हाला नव्हताच. शिवाय एक दिवस जे अटळ घडणार होतं, ते घडलंच. आमच्या जवळच पिण्याचं पाणी संपलं !

मी म्हणालो,

'या चोवीस तासात आपल्याला पाणी शोधून काढले पाहिजे नाही तर आपण संपलोच म्हणून समजा.'

कॅप्टन गुडच्या चेहऱ्यावर आता भीती दिसायला लागली होती. पण सर हेन्री मात्र अचल होते. ते मला म्हणाले,

'ॲलन, तुझ्या जवळचा नकाशा दाखव. वाळवंटात एका जागी पिण्याचं पाणी भरपूर आहे हे आपण नकाशात पाहीलयं.'

खिशातला नकाशा बाहेर काढून मी तो वाळूवर पसरला. वाळवंटात किती मैल आम्ही चाललो असू, याचाही अंदाज केला.

नकाशात दाखवलेली पाण्याची जागा कुठं असावी, याचा आम्हाला अंदाज करता येणं शक्यच नव्हतं. पण उम्बोपानं नकाशावर नजर टाकली मात्र, तो खळाळून हसला आणि म्हणाला,

'आता आपण मरत नाही, आपण पाण्याच्या जागेजवळ येऊन पोचलो आहोत. तरी अजून आठ ते दहा तास प्रवास करावा लागेल.'

'कशावरुन ?' मी रागावून विचारले.

'गोऱ्या माणसा, तू माझ्यावर विश्वास ठेव. मी या सगळ्या भागात हिंडलोय्. या वाळवंटाच्या रेतीचा मला चांगला परिचय आहे. तुम्ही माझ्या मागून चला.'

प्राप्त परिस्थितीत उम्बोपामागून जाण्यावाचून आम्हाला पर्यायच नव्हता. मुकाट्यानं आम्ही त्याच्या मागून निघालो. पण उम्बोपाच्या मागून जाताना एक भीती आमच्या मनात होती. जर रस्ता चुकला तर? वाळवंटात हातपाय घासून मरण्याखेरीज आमच्याजवळ दुसरं काहीच उरलं नसतं.

उम्बोपानं तो नकाशा, आपल्या हातात घेतलेला होता. एखाद्या श्वापदाप्रमाणं वाळूचा वास घेत घेत, तो पुढे चालत होता आणि आम्ही दमलेले सर्वजण पाय ओढत ओढत मागून जात होतो.

पण उम्बोपानं त्याचं वचन पाळलं. जराही वाट न चुकता तो थेट, वाळवंटातल्या पाणथळ भागात आम्हाला घेऊन आला. पाणी बघून आम्ही अक्षरशः वेडे झालो. झऱ्यातून येणाऱ्या पाण्यात गडबडा लोळत कॅप्टन गुडनं आंघोळ साजरी केली. भरपूर पाणी पिऊन आणि आमच्या जवळच्या कातडी पिशव्या भरून घेऊन आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो.

आता आमचा विश्वास दुणावला होता. एका नवीन आशेने आम्ही झपाटलो होतो आणि आम्ही केलेल्या तपश्चर्येला लवकरच फळ आलं. वाळवंटात एका रात्री प्रवास करत असताना, आम्हाला दूरवर सुलीमानचे डोंगर दिसले. उम्बोपानं

अत्यानंदानं आरोळी ठोकली. मनातल्या मनात मी देवाचे आभार मानले. सर हेन्री आणि कॅप्टन गुड यांना तर इतका आनंद झाला होता की, तो मी जन्मात विसरणे शक्य नाही.

दुरून डोंगर साजरे या म्हणीचं प्रत्यंतर आम्हाला लवकर येणार होतं. कारण दुरून सुंदर दिसणारे सुलीमानचे डोंगर चांगलेच ओबडधोबड होते. डोंगर उतारावर कुठंही गवत दिसत नव्हतं.

या डोंगरात कुठे न् कुठे तरी ज्वालामुखी सुध्दा असावा. कारण डोंगराच्या उतारावर ज्वालामुखीच्या लाव्हारसापासून तयार झालेले दगड आम्हाला कित्येक जागी पहायला मिळाले. पण आता आम्ही थांबणार नव्हतो. झपाटल्या प्रमाणं आम्ही तो डोंगर ओलांडला.

निम्मा प्रवास सुखरुप झाल्यामुळं आम्ही बेहद्द खूष होतो. सुलीमानचा डोंगर ओलांडल्यावर आम्ही काही काळ विश्रांती घेतली.

या विश्रांतीच्या काळात पुढच्या प्रवासाबद्दलच्या आमच्या योजना तयार झाल्या. आता सिबाचा डोंगर आम्हाला ओलांडायचा होता. त्या डोंगरापलिकडं नेमकं काय आहे या विषयी आम्हाला फारशी माहीती नव्हती. सिबाच्या डोंगरापलिकडं कुकुआना हे झुलू जमातीच प्रचंड राज्य आहे. एवढंच मला स्मरत होतं. या राज्याबद्दल उम्बोपाला काही माहिती आहे का ? हे पहाण्यासाठी, मी त्याला सहज विचारलं,

'उम्बोपा, कुकुआना येथील झुलू जमातीबद्दल तुला काय माहिती आहे ?'

उम्बोपाचे डोळे चकाकले. किंचीत हसून तो म्हणाला,

'कुकुआनाच्या राज्याबद्दल मला थोडीशी माहिती आहे. तिथले लोक उंचेपुरे आणि काळे आहेत. माझ्यासारखेच. शिकार करण्यात त्यांचा हात कोणी धरणार नाही. त्यांचा कुणी एक चांगला राजा होता असं मी ऐकलयं, पण कुणीतरी त्याला घातपात करून मारलं. त्याचा मुलगा तोही अचानक कुठेतरी अदृश्य झाला. आज कुकुआनाचं साम्राज्य कुणा दुष्ट माणसाच्या ताब्यात आहे असं मी ऐकलयं.'

हे सगळं ऐकून मी पुन्हा एकदा चक्रावून गेलो. हा उम्बोपा आहे तरी कोण ? याला इतकी माहिती आहे तरी कशी ? प्रत्यक्षात मी काहीच बोललो नाही. शेवटी सिबाचा डोंगर आम्ही चढलो. डोंगराच्या माथ्यावर गेल्यावर आम्ही पलिकडच्या बाजूला खाली दरीत नजर टाकली आणि आम्ही आश्चर्यानं थक्कच झालो. हिरव्या

गर्द जंगलामधे कुकुआनाचं पसरलेलं प्रचंड साम्राज्य आम्हाला दिसलं.

ते सुंदर दृश्य बघून आमचं देहभान जणू हरपून गेलं. खोलवर दरीत एखादा पाचूचा खडा ठेवावा तसं कुकुआनाचं राज्य दिसत होतं. खालच्या गर्द जंगलातून वहाणारी नदी म्हणजे चांदीचा एखादा पट्टा असावा, तशी दिसत होती.

ते अद्भुत दृश्य बघून आम्ही खिळूनच गेलो. मी उम्बोपाकडं नजर टाकली. त्याच्या चेहऱ्यावर आनंदच उसळला होता.

आपलं घर पाहून एखाद्याला आनंद व्हावा, तसा आनंद उम्बोपाच्या चेहऱ्यावर दिसला. उम्बोपा कुकुआनाच्या राज्यातलाच असला पाहीजे अशी एक भावना माझ्या मनात सहज डोकावून गेली.

सर हेन्रींनी माझ्याशी हस्तांदोलन केलं आणि ते मला म्हणाले,

'ॲलन ! निम्मी लढाई तर आपण जिंकलीच. आता पुढचाही प्रवास फारसा अवघड असणार नाही असं मला वाटतं.'

कॅप्टन गुडला तर हर्षवायू व्हायचा तेवढा बाकी राहीला होता. आनंदानं उडी मारून तो उंच स्वरात ओरडला,

'आम्ही जिंकलो ! आम्ही जिंकलो !'

कॅप्टन गुडच्या आरोळीचे प्रतिध्वनी कितीतरी वेळखालच्या दरीत घुमत राहीले आणि त्यांचा प्रतिध्वनी आमच्या कानापर्यंत आला,

'आम्ही जिंकलो ! आम्ही जिंकलो !'

***

म. वं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
2600

## ३. कुकुआनाच्या राज्यात

कुकुआनाचं राज्य बघून आमचे सगळे श्रम कुठल्या कुठे पळून गेले. कॅप्टन गुड तर आनंदानं नाचायलाच लागला. रखरखीत वाळवंटातून आणि उजाड डोंगरातून प्रवास केल्यानंतर कित्येक दिवसांनी आम्हाला प्रथमच गवताची मखमली हिरवळ आणि हिरवीगर्द झाडी दिसली.

अचानक उम्बोपानं माझ्या खांद्याला स्पर्श करून माथ्यावरच्या टेकडीकडं बोट दाखवलं. त्या दिशेनं मी पाहीलं आणि थक्कच झालो. एक उमदा काळवीट त्या टेकडीवर चरत उड्या मारत होता.

उम्बोपानं भाला उचलला आणि काळविटाचा वेध घेण्यासाठी हातात पेलला. पण मी खुणेनंच त्याला थांबवलं. खांद्यावरची बंदूक हातात घेतली. नेम साधला. पुढच्याच क्षणी बंदूकीच्या नळीतून झुमकन् गोळी सुटली. त्या गोळीनं काळविटाचा अचूक वेध घेतला. वेदनेनं काळविटानं हवेत उंच उडी घेतली आणि पुढच्याच क्षणी तो खाली कोसळला.

कित्येक दिवसानंतर आम्हाला चमचमीत मेजवानी मिळाली. रखरखीत वाळवंट आणि सुलीमानचा डोंगर ओलांडत असताना आम्हाला हिरवळ सुध्दा दिसली नव्हती, मग एखादा प्राणी दिसणं चमत्कार ठरला असता.

चमचमीत मेजवानी झाल्यानंतर सॉलोमनच्या खजिन्याकडं जाणारी वाट आम्ही शोधायला लागलो. अचानक सर हे·री ओरडले,

'तो पहा ! सॉलोमनच्या खजिन्याकडं जाणारा रस्ता दिसला मला !'

कॅप्टन गुड आणि मी दोघांनीही सर हेन्री दाखवत असलेल्या दिशेकडं पाहिलं.

दगडातून कोरलेली वाट होती ती. आम्हाला मोठं आश्चर्य वाटलं. वळणावळणानं खाली उतरणारी ती वाट, त्या दगडांवर कोणीतरी मुद्दाम तयार केली असावी. कॅप्टन गुडनं आनंदानं टाळीच वाजवली.

एवढ्यात उम्बोपा मोठ्यानं हसला. आम्ही चमकून त्याच्याकडं पाहिलं. अचानक गंभीर होत उम्बोपा म्हणाला,

'गोऱ्या माणसांनो, ही वाट सॉलोमनच्या खजिन्याकडं नव्हे, तर कुकुआनाच्या साम्राज्याकडं जात आहे.'

उम्बोपा म्हणत होता हे खरंच होतं. पण, आता सिबाच्या डोंगरावरुन खाली उतरण्यासाठी दुसरी वाटच नव्हती. त्यामुळं त्याच वाटेनं खाली उतरायचं ठरवलं आम्ही.

दगड तोडून ती वाट मुद्दाम तयार केलेली होती. कदाचित कुकुआनाच्या लोकांना सिबाच्या डोंगरावर येता यावं, म्हणून झुलू लोकांनी ती वाट मुद्दाम केली असावी.

कुकुआनाचं साम्राज्य दरीत खोलवर पसरलेलं होतं. साहजिकच सिबाचा डोंगर चढायला जितका वेळ लागला, त्यापेक्षा दुप्पट तिप्पट वेळ डोंगर उतरण्यासाठी लागणार होता.

निम्मा डोंगर उतरल्यावर आम्ही एका झऱ्याजवळ विश्रांती घेण्यासाठी थांबलो. प्रवास करुन सगळेच दमले होते. कॅप्टन गुड मात्र अजून उत्साही होता.

अत्यंत नीटनेटकं रहाण्यची त्याची सवयच होती. प्रथम त्यानं अंगावरचे कपडे उतरवून झऱ्याच्या पाण्यात स्वच्छ आंघोळ केली आणि आंघोळीनंतर तो दाढी करायला लागला.

कॅप्टन गुडची ही सवय आम्हाला माहिती असल्यामुळं आम्ही गंमतीनं त्याच्याकडं बघत होतो. कॅप्टन गुड सुध्दा एकाग्रतेनं दाढी करण्यात मग्न झाला होता.

एवढ्यात काही भयंकर घडलं. आमच्या डोळ्यापुढं एकदम काहीतरी चमकलं. कॅप्टन गुडच्या डोक्याजवळून सणाणत जावून समोरच्या झाडात घुसलं. आश्चर्यानं थक्क होवून आम्ही पहातच राहीलो.

तो झुलू लोकांचा भाला होता. त्या भाल्याचं धारदार पातं झाडाच्या फांदीत घुसलं होतं. खरं तर तो भाला कॅप्टन गुडच्या डोक्यात सरळ घुसायचा. केवळ काही

इंचाचा फरक पडला.

आम्ही आश्चर्याच्या धक्क्यातून बाहेर पडण्यापूर्वीच झुलू जमातीचे आठदहा उंचेपुरे लोक झाडीतून आमच्यापुढं आले. मी त्यांच्याकडं पाहिलं. सगळेच जण उंचेपुरे सशक्त आणि धट्टेकट्टे होते. त्यांच्या अंगावर चित्त्याची कातडी होती. गळ्यात सिंहाच्या नखाच्या माळा होत्या.

माझ्या मनात विजेसारखी कल्पना लखलखली. उम्बोपा या लोकात अगदी सहज खपला असता.

त्या झुलू लोकांचा एक पुढारी होता. तो इतरांच्यापेक्षा वयानं मोठा असावा. बाकी सगळ्या तरुणांचे भाले आमच्यावर रोखले होते. कॅप्टन गुड भीतीनं थरारला होता. सर हेन्री पुतळ्यासारखे निश्चल उभे होते. उम्बोपा समोरच्या माणसावर झडप घालण्याच्या पवित्र्यात उभा होता.

परिस्थितीचं गांभीर्य ओळखून मी पटकन् झुलू भाषेत म्हणालो,

'नमस्कार !'

त्या टोळीच्या म्होरक्यानं आमच्याकडं आश्चर्यानं पाहिलं. आमच्यापैकी कुणी झुलू भाषा बोलू शकेल याची त्याला कल्पनाच नसावी. संशयानं माझ्याकडं पहात तो उत्तरला,

'नमस्कार ! तुम्ही कोण आहात ? कुठून आलात ? काय काम आहे तुमचं ? आणि तुमचा रंग गोरा कसा ? आणि हा कोण ? हा तर आमच्यातलाच दिसतोय्.'

एकूण परिस्थिती भलतीच गंभीर होती हे माझ्या लक्षात आलं. मी शांतपणे म्हटलं,

'आम्ही दुरून आलो आहोत, परदेशातून. तुमच्या बरोबर मैत्री करण्यासाठी.'

'अशक्य ! परदेशातून आलेल्या कोणत्याही माणसाबरोबर आम्ही कधीही मैत्री करत नाही. कुकुआनाच्या राज्यात येणाऱ्या परदेशी माणसाला मरावंच लागतं. कारण आमच्या राज्यात तसा नियमच आहे.'

त्या टोळीचा म्होरक्या काय म्हणाला हे मी इंग्रजी भाषेमधे माझ्या मित्रांना सांगितलं. कॅप्टन गुड हादरलाच. कपाळावर हात मारून घेत, तो मोठ्यानं ओरडला,

'अरे बापरे ! म्हणजे आपण मेलोच आता.'

पण हे म्हणत असताना नेहमीच्या सवयीप्रमाणं कॅप्टन गुडनं तोंडातली दाताची कवळी एकदा बाहेर काढली आणि पुन्हा फटकन् आत बसवली.

गुडनं त्याच्या सवयीप्रमाणं केलेल्या त्या प्रकारानं जादूची कांडी फिरावी तसा परिणाम झाला. आमच्यासमोर उभ्या असलेल्या झुलू सैनिकांनी भीतीनं किंकाळ्या फोडल्या आणि ते सर्वजण झपाट्यानं दहा पावलं मागं सरकले. त्यांचा पुढारी किंचाळला,

'या माणसाला चेटूक येतं. त्यानं आपले दात बाहेर काढले आणि आत बसवले.'

सर हेन्रींनी तो मोका साधला. ते दबलेल्या आवाजात कॅप्टन गुडला म्हणाले,

'कॅप्टन गुड, काढ तुझी कवळी बाहेर आणि या लोकांना भीती दाखव.'

सर हेन्रीच्या आज्ञेवरून, कॅप्टन गुडनं तोंडातली कवळी बाहेर काढली आणि एकदम झुलू सैनिकांच्या पुढं धरली आणि तो गदगदा हसला.

एवढे काळे पत्थरासारखे अवाढव्य देहाचे ते झुलू सैनिक आता तर पार खलास झाले आणि भीतीनं एकेक पाऊल मागे सरकायला लागले.

धीर करुन त्यांच्या म्होरक्यानं विचारलं,

'परदेशी माणसांनो, ही कसली भयंकर जादू तुमच्या जवळ आहे ? हा मनुष्य दात बाहेर कसा काढतो ?'

पण त्याचे शब्द पुरे होण्यापूर्वीच कॅप्टन गुडनं पुन्हा गंमत केली. झपाट्यानं त्यानं तोंडात पुन्हा दात बसवले. त्याच्या तोंडाच्या बोळक्याच्या जागी शुभ्र पांढरे दात दिसायला लागले. त्या टोळीच्या म्होरक्यानं भीतीनं किंकाळी फोडली.

या झुलू लोकांच्या अज्ञानाचा आम्हाला केवढा फायदा मिळालेला होता. या झुलू लोकांनी आयुष्यात कधीही कवळी पाहिलेली नव्हती. कॅप्टन गुडच्या एकाच डोळ्यावर असलेल्या चष्म्याच्या भिंगाकडं झुलू सैनिक आश्चर्यानं बघत होते.

त्या टोळीचा म्होरक्या चाचरत म्हणाला,

'तुम्ही तर देवाच्या राज्यातून आलेले दिसता, नाहीतर दात बाहेर काढायचे आणि पुन्हा तोंडात बसवायचे हे आजपर्यंत कोणाला जमलय् ? तुमचा रंग गोरा कसा ? आणि या माणसांचा एकच डोळा पारदर्शक कसा आहे ?'

आता ही संधी गमावणं मूर्खपणाचं होतं. मी पटकन म्हणालो,

'होय ! आम्ही खरोखरच देवाच्या राज्यातून आलेलो आहोत. आमच्या जवळ अद्भुत शक्ती आहेत. मनात आणलं तर आम्ही तुम्हाला जादूच्या आवाजानं खलास करू.'

'काय ? जादूच्या आवाजानं ?'

'होय !,' मी म्हणालो, 'ही पहा आमची जादूची नळी. यातून आवाज निघाला की, समोरचा मनुष्य खलास.'

मी हातातली बंदूक उंचावली. कॅप्टन गुड पुन्हा गदगदा हसला. झुलू सैनिक भीतीनं थरारले. पण त्यातल्या एका धीट सैनिकानं धीर करुन मला विचारलं,

'तुम्ही म्हणताय् हे खरं कशावरुन ?'

आता मी मोठ्यानं हसलो. मोठ्यानं गरजलो,

'आम्ही देवाची माणसं. म्हणूनच तुला मारत नाही. नाही तर नुसत्या आवाजानं तुला खलासच केलं असतं. ते बघ, ते छोटं हरीण पाहीलंस ? त्याला मी नुसत्या आवाजानं कसं मारतो बघ. सावधान ! स्वतःचा जीव सांभाळ.'

एवढं बोलून मी बंदूक सरसावली. नेम धरला आणि खटका ओढला. धाडकन आवाज झाला आणि पुढच्याच क्षणी ते हरीण खाली कोसळलं.

आता तर झुलू सैनिक भीतीनं खलासच झाले. सगळ्यांनी आमच्या समोर गुडघे टेकले. त्यांचा म्होरक्या गयावया करत म्हणाला,

'हे गोऱ्या माणसांनो, तुम्ही खरोखरच देवाच्या राज्यातून आलेले आहात. आमच्यापैकी कोणाला मारु नका.'

'माझं नाव इन्फॅडूस. मी काफाचा मुलगा. एकेकाळी काफा हा कुकुआना लोकांचा राजा होता. तुम्हाला प्रश्न विचारणारा हा तरुण म्हणजे स्क्रॅगा. हा ट्वाला राजाचा मुलगा. तो राजा भयंकर आहे. त्याचं नाव काढलं तरी सुध्दा इथली माणसं थरथरा कापतात.'

मी म्हणालो,

'इन्फॅडूस, या झुलू लोकात तू जरा समंजस दिसतोस. आम्हाला ट्वाला राजाकडं घेऊन चल. पण लक्षात ठेव. घातपाताचा कोणताही प्रकार होता कामा नये. जर तसा प्रयत्न कोणी केला तर तुम्ही संपलात म्हणून समजा. या पारदर्शी डोळ्यातून बाहेर पडणारा एक किरण तुम्हाला जाळून टाकील. आमचे विरघळणारे आणि अदृश्य होणारे दात तुम्हाला चावून खलास करतील आणि नुसत्या आवाजानं शत्रूला मारणाऱ्या या आमच्या जादूच्या नळ्या पाहिल्यात ? तेव्हा सावधान !'

माझ्या बोलण्याचा झुलू सैनिकांच्यावर चांगलाच परिणाम झाला होता. कारण ते सर्वजण एका स्वरात ओरडले,

'कूम कूम !'

नंतर मला कळलं. आपल्यापेक्षा श्रेष्ठ वाटणाऱ्या लोकांना ते याच पध्दतीनं सलाम करत. कुकुआना राज्यामधे आलेल्या महान व्यक्तीनाच अशा प्रकारचा सलाम केला जात असे. कॅप्टन गुडने केलेल्या युक्तीमुळं झुलू सैनिक आम्हाला देवदूतच समजले होते.

पण ह्या सगळ्या प्रकारामधे एक सूक्ष्म गोष्ट माझ्या लक्षातून सुटली नाही. स्क्रॅगाचा चेहरा संतापानं फुललेला होता. झुलू सैनिकांनी आमच्यासारख्या परदेशी माणसांना सलाम करावा हे त्याला अजिबात पटलेलं नव्हतं.

दगडामधे कोरलेल्या पांढुरक्या वाटेनं आम्ही ट्वालाला भेटायला निघालो. माझी नजर चहुबाजुला भिरभिरत होती.

'दगडातली ही वाट कोणी कोरली ?' मी कुतुहलानं इन्फॅडूसला विचारलं.

'ते नक्की कोणालाच माहीत नाही. आमच्या अनेक पिढ्या येथे नांदल्या. पण दगडातला हा रस्ता कोणी केला हे अजूनही उलगडलेलं नाही. पण आमच्याकडे गॅगूल नावाची म्हातारी चेटकीण आहे.

'तिला पुढचं मागचं सगळं दिसतं. ती म्हणते की झुलू लोक दहा हजार वर्षापूर्वी उत्तरेकडून इथं आले. त्यांना ही डोंगरांची रांग ओलांडता आली नाही म्हणून कुकुआनामधे झुलूंचं राज्य झालं.'

सर हेन्री मोठ्यान हसले. इन्फॅडूसचं म्हणणं त्यांना अजिबात पटलेलं नव्हतं. ते मला इंग्रजीत म्हणाले,

'काही तरीच वेड्यासारखी बोलतात ही माणसं. चेटकीणीला कधी भूत भविष्य कळतं ?'

पण मी मात्र हसलो नाही. कारण गॅगूल नावाचं प्रकरण आपल्याला जड जाणार हे त्याच क्षणी माझ्या लक्षात आलं.

इन्फॅडूस त्याची कथा पुढे सांगू लागला,

'आमचे झुलू लोक इथंच जन्मले आणि इथंच वाढले. आमची माणसं इतकी शूर आहेत की, गुहेतला सिंह ओढून मारू शकतात. उघड्या मैदानात माजलेल्या हत्तीशी झुंज घेण्याची ताकद आहे त्यांच्यात.

'इथल्या प्रत्येक झुलू सैनिकाच्या अंगावर वाघाचं कातडं दिसेल तुम्हाला. ते कातडं त्यांना कोणी भेट म्हणून दिलेलं नाही. मनगटाच्या जोरावर इथल्या प्रत्येक

सैनिकानं एकेका वाघाची शिकार केलेली आहे.'

माझं लक्ष खाली दरीकडं होतं. आता आम्ही कुकुआना राज्याच्या जवळ येत चाललो होतो. मी इन्फॅडूसकडं वळून म्हटलं,

'तू मला तुमच्या राजाची, म्हणजे ट्वालाची माहिती सांग.'

'ती एक फार मोठी कहाणी आहे. मी स्वतः राजघराण्यातलाच आहे. माझ्या अंगात राजाचं रक्त आहे. माझा मोठा भाऊ इमोटू इथला राजा होता. सगळ्या झुलू लोकांना आवडायचा तो.

'इमोटूला एक मुलगा होता. त्याचं नाव इग्नोसी. तो मुलगा तीन वर्षाचा असताना कुकुआनाच्या राज्यात दुष्काळ पडला. उपासमारीनं लोक मेले. त्यामुळं लोकांचा राजावरचा विश्वास उडाला.

'त्यातच गॅगूल चेटकीणीनं इमोटूला सिंहासनावरून खाली खेचायचं ठरवलं. तिनं इमोटूची हकालपट्टी करुन ट्वालाला सिंहासनावर बसवलं.'

'पण ट्वाला राजघराण्यातला होता का ?' मी विचारलं.

'होय ! कारण त्याच्या कमरेवर निळ्या नागाची खूण होती. झुलू लोकात फक्त राजघराण्यातल्या लोकांच्याच कमरेवर अशी खूण असते. ट्वालाच्या कमरेवर तशी खूण आहे. म्हणूनच झुलू लोकांनी त्याला राजा मानला.'

'पण इमोटूच काय झालं ?'

इन्फॅडूसनं एक उसासा टाकला. क्षणभर तो काहीच बोलला नाही. नंतर जड अंतःकरणान म्हणाला,

'ट्वालानं इमोटूला मारलं. आमचा एक चांगला राजा विनाकारण मारला गेला.'

'आणि त्या मुलाचं काय झाल ?'

'तीन वर्षाच्या इग्नोसीला घेऊन त्याची आई, इथून पळून गेली. त्यालाही बरीच वर्षं लोटली. त्या दोघांना अजून कोणीही पाहीलं नाही. बहुधा ते दोघंही मेले असावेत.'

इन्फॅडूस ही कथा सांगत असताना, माझं लक्ष उम्बोपाकडं वारंवार जात होतं. कारण इन्फॅडूसच्या त्या कथेमधे तो जणू हरवून गेलेला होता. इन्फॅडूसचा एकेक शब्द ऐकत असताना त्याच्या चेहऱ्यावर विचित्र भाव उमटत होते.

मला नवल वाटलं. उम्बोपा झुलू लोकांपैकीच असावा.

इन्फॅडूसची कथा सांगून संपली त्यावेळी आम्ही कुकुआनाच्या राज्यात येऊन पोचलो होतो. आम्ही येणार असल्याचा निरोप इन्फॅडूसनं अगोदरचं पुढं पाठविला होता.

झुलू सैनिकांचं पहिलं दर्शन आम्हाला घडलं. हजारो झुलू सैनिक त्या मैदानात शिस्तबध्द उभे होते. ते उंचेपुरे आणि तगडे सैनिक बघून मी थरारलोच. कारण प्रत्येक सैनिकाच्या अंगात रानरेड्याची ताकद असावी.

आम्ही त्यांच्या समोर आल्याबरोबर सगळ्यांनी भाले उंच करुन मोठी आरोळी ठोकली,

'कूग !'

त्या गर्जनेबरोबर डोंगरातून अनेक वेळेला प्रतिध्वनी उमटले.

इन्फॅडूसच्या सांगण्यावरुन आम्हाला कळलं की, आम्ही 'लू' या ठिकाणी पोहचलो होतो. 'लू' ही जात इन्फॅडूसच्या ताब्यात होती. ट्वालाचं साम्राज्य अजून लांब होतं. 'लू'हे गाव तसं प्रचंड होतं. त्या गावाच्या मधून एक रूंद पात्राची नदी वहात होती. कित्येक मैलांच्या परिसरात पसरलेल्या त्या 'लू' गावाच्या मागे आभाळाला भिडलेले डोंगर होते. कदाचित त्या डोंगरांमधेच सॉलोमनचा खजिना असावा.

आम्ही सर्वानीच 'लू' या गावी काही दिवस मुक्काम केला. इन्फॅडूसकडून सॉलोमनच्या खजिन्याची थोडी माहिती आम्हाला मिळाली. पण इन्फॅडूसनं सुध्दा हा खजिना प्रत्यक्ष खचितच पाहिला नव्हता.

इन्फॅडूसनं आम्हाला सांगितलं,

'या डोंगरात तीन उंच टेकड्या आहेत. त्यांना तीन चेटकीणी असं म्हणतात. त्या तीन चेटकीणींच्यामधे कुठंतरी एक खोल गुहा आहे. त्या गुहेतच कुठंतरी सॉलोमन राजाचा खजिना दडला आहे.'

'या खजिन्याच्या शोधासाठी आजपर्यंत किती माणसं इथं आली ?'

'पुष्कळ ! त्यांना मौल्यवान् खडे हवे होते. पण त्यातला एकही वाचला नाही. परदेशी माणसांना ठार मारण्याचा गॅगूलचा हुकूम आहे.'

मी इतरांच्याकडे वळून म्हणालो,

'समोरच्या डोंगरात नक्कीच सॉलोमनचा खजिना आहे.'

अचानक उम्बोपा पटकन म्हणाला,

'त्या डोंगरात अपरंपार धन आहे. तिथं पेटारेच्या पेटारे मौल्यवान रत्नांनी भरलेले आहेत.'

उम्बोपाचे हे शब्द ऐकून मला मोठं नवल वाटलं. मी धारदार शब्दांत विचारलं,

'पण तुला हे कसं माहिती ? तू तर कधीच तिथं गेलेला नाहीस.'

उम्बोपा मोठ्यानं हसला आणि म्हणाला,

'मला काल रात्री स्वप्न पडलं आणि त्यात मला हे सगळं दिसलं.'

मला आणखीनच नवल वाटलं. उम्बोपाचं व्यक्तिमत्त्व गूढ होतं खास !

थोडेच दिवसात आम्ही 'लू' गाव सोडून बाहेर पडलो आणि खालच्या राजधानीकडं निघालो. हे अंतर फार नव्हतं. तिथंही हजारो सैनिक शिस्तबध्द उभे होते. अशा रानटी लोकांमधे एवढी शिस्त पाहून मी थक्कच झालो.

आम्हाला बघून सगळे सैनिक गरजले,

'कूम ! कूम !'

समोरच्या झोपडीतून ट्वाला बाहेर आला. उंचापुरा, सशक्त आणि धिप्पाड. त्याच्या डोक्यावर पिसांचा एक खास मुगूट होता. त्यात उंच खोवलेली लाल पिसं वाऱ्यावर डोलत होती. ट्वालाच्या हातात एक प्रचंड भाला होता.

ट्वालाला पाहिल्याबरोबर सगळ्या सैनिकांनी आदरानं माना खाली घातल्या आणि दुसऱ्याच क्षणी ते तार स्वरात ओरडले,

'कूम ! कूम !'

ट्वालाच्या मागोमाग त्याचा मुलगा स्क्रॅगा बाहेर आला. त्याच्या चेहऱ्यावर खुनशी भाव होते.

झोपडी बाहेरच ट्वालाचं सिंहासन मांडलेलं होतं. त्यावर कुठल्यातरी प्राण्याचं जाड कातडं पांघरलेलं होतं. ट्वाला त्या सिंहासनावर बसल्याबरोबर सगळीकडं पूर्ण शांतता पसरली.

आम्ही कुतुहलानं समोर पहात होतो. एवढ्यात समोरच्याच झोपडीतून एक भयानक विद्रुप आकृत्ती बाहेर आली. इतकी ओंगळ, बीभत्स आणि कुरुप व्यक्ती मी आयुष्यात दुसरी कधी पाहिली नाही. मी काही बोलण्यापूर्वीच सर हेन्री माझ्या कानात पुटपुटले,

'गॅगूल !'

गॅगूलचं रुप खरोखरच हिडीस होतं. तिच्या तोंडात एकही दात शिल्लक

नव्हता. चेहऱ्यावर सुरकुत्यांची जाळीच जाळी पसरलेली होती. कंबरेत वाकल्यामुळं तिचं शरीर धनुष्यासारखं वाकलेलं होतं. आश्चर्य म्हणजे तिच्या डोक्यावर एकही केस शिल्लक राहीलेला नव्हता.

तिचं ते भयानक रूप बघून, कॅप्टन गुड हादरलाच. नाचल्यासारखी पावलं टाकत गॅगूल ट्वालाच्या बाजूला आली. तिनं एका सैनिकाकडं बोट दाखवलं आणि चिरक्या आवाजात ती किंचाळली,

'तो पहा ! तो पहा ! आपल्या देवाचा बळी ! मारा त्याला !'

गॅगूलचे शब्द पुरे होण्यापूर्वीच स्क्रॅगानं आपला भाला सरसावला आणि सपकन् त्या सैनिकाच्या दिशेनं फेकला. त्या शांत वातावरणात एक भयानक किंकाळी घुमली. पोटात घुसलेला भाला बाहेर काढण्याचा प्रयत्न करत तो सैनिक तडफडत खाली कोसळला, शेवटचे आचके देताना त्याच्या जीवाची होणारी तगमग पाहून, आम्ही शहारुन गेलो.

कोणताही अपराध नसताना एका सैनिकाला, केवळ गॅगूलच्या शब्दाखातर बळी जावं लागलं होतं.

पुन्हा एकदा त्या मैदानात स्मशानशांतता पसरली. ट्वालानं खुनशी मुद्रेनं आमच्याकडं पाहिलं आणि तो ओरडला,

'तुम्हीच काय ते देवदूत ? आम्ही तुम्हाला या सैनिकाप्रमाणंच आता खलास करणार आहोत.'

आता काही वेगवान हालचाल करणं आवश्यक होतं. मी उंच आवाजात हसलो आणि स्वरामधे जास्तीत जास्त तुच्छता आणून म्हणालो,

'मूर्ख राजा, आम्हाला प्रत्यक्ष देव सुध्दा मारु शकत नाहीत. मग तुझी काय कथा ?'

हे शब्द मी मुद्दामच झुलू भाषेत बोललो होतो. मी काय म्हणतोय् हे तिथं उपस्थित असलेल्या प्रत्येक सैनिकाला कळावं हाच माझा हेतू होता.

माझ्या शब्दानी जणू जादू केली. झुलू सैनिक आमच्याकडं आदरानं आणि आश्चर्यानं पाहू लागले. मी पुन्हा एकदा गरजलो,

'मूर्ख राजा, आमच्या अंगी काय दैवी ताकद आहे, ते तू आता प्रत्यक्षच बघ.'

एवढं बोलून मी सर हेन्रींना खूण केली. क्षणार्धात आम्ही दोघांनी आमच्या बंदुका सरसावल्या आणि सरसर गोळ्या झाडल्या. झोपडीच्या जवळच ट्वालाचे

दोन खास बैल उभे होते. गोळ्या लागता क्षणीच ते रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळले.

आश्चर्यानं ट्वालानं त्याचा जबडा उघडला. हजारो सैनिक घाबरुन दोन पावले मागे सरले. स्क्रॅगाही घाबरला. त्याच्या चेहऱ्यावरची भीती आम्हाला स्पष्ट दिसत होती.

पण या घटनेचा परिणाम फक्त एकाच व्यक्तीवर झाला नव्हता, ती व्यक्ती म्हणजे गॅगूल.

मी गॅगूलकडे पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर असलेली सुरकुत्यांची जाळी अधिकच दाट झाली होती. वेडीवाकडी पावलं टाकत आणि नाचत गॅगूल पुढं आली आणि तिनं चिरक्या आवाजात काही मंत्र पुटपुटायला सुरवात केली.

गजग्यावर लाल रंग ओतावा तसे दिसणारे तिचे डोळे, ती गरागरा फिरवत होती. कोल्ह्यानं किंवा लांडग्यानं वास घेत फिरावं तशी ती इतस्ततः वास घेत फिरू लागली आणि अचानक किंचाळली,

'मला रक्ताचा वास येतोय्.— ही गोरी माणसं हिरे पळवून नेण्यासाठी आली आहेत.--- पण, मला सगळी रहस्यं माहीत आहेत--- हा तुमच्या बरोबर कोण झुलू आहे ?--- त्याच्या अंगावरचं वाघाचं कातडं बाजूला घ्या--'

पण गॅगूलचे शेवटचे शब्द स्पष्ट उमटले नाहीत. कदाचित् तिच्या वयाला एवढं नाचणं आणि बोलणं झेपलं नसावं. कारण शेवटचे शब्द स्पष्ट बोलण्यापूर्वीच ती धाडकन् खाली कोसळली.

तिच्या पडण्याबरोबर सगळीकडं एकदम स्मशानशांतता पसरली. ट्वालानं त्याच्या दोन अंगरक्षकांना खूण केल्याबरोबर ते पुढं आले आणि पोतं उचलावं त्याप्रमाणं त्यांनी गॅगूलला उचललं आणि तिला घेऊन ते झोपडीकडं गेले.

आमच्या बंदुका अजूनही रोखलेल्याच होत्या. बंदुकीची अद्भुत किमया बघून ट्वाला बहुधा घाबरलेला असावा. अस्वस्थपणे तो म्हणाला,

'मलाही रक्तपात नको आहे. पण गॅगूल म्हणते ते कधी खोटं होत नाही. ती काय म्हणाली, याचा मला विचार केलाच पाहीजे.'

सर हेन्री काहीतरी बोलणार होते. पण मी खुणेनंच त्यांना गप्प बसवलं. ट्वाला एकदम म्हणाला,

'आजचा दरबार संपलेला आहे.'

एवढं बोलून तो ताडकन् उठला आणि झपाट्यानं त्याच्या झोपडीत निघून गेला. एक अक्षरही न बोलता सगळे सैनिक बघता बघता पांगले आणि त्यांच्या रहात्या जागेकडं निघून गेले.

सर हेन्री आणि मी प्रसन्नपणे हसलो. खूष झालेल्या कॅप्टन गुडनं तर मला टाळीच दिली. कारण अगदी स्पष्ट होतं. युध्दाची पहिली फेरी आम्ही अगदी सहजपणे जिंकली होती.

***

## ४. चंद्रग्रहण

पहिली चकमक जिंकून आम्ही इन्फॅडूसच्या झोपडीत आलो. मी त्याला म्हटलं,

'इन्फॅडूस, तुझा ट्वाला राजा भयंकर दिसतोय्. आम्हाला कोणालाच तो आवडला नाही. अकारण कोणालाही मारणाऱ्या राजाला क्रूरच म्हटलं पाहिजे.'

इन्फॅडूसच्या चेहऱ्यावरचे भाव थोडे बदलते होते. तो हलक्या आवाजात बोलला,

'झुलूंच्या या राज्यात कोणीही मनुष्य सुरक्षित नाही. आज रात्री गॅगूल बरोबर ट्वालाचं काही तरी गुप्त खलबत नक्कीच होणार. कारण ती बाई महाभयंकर आहे.'

'या गॅगूलचं वय काय असेल ?'

'तसं नक्की सांगता येणार नाही. पण लोक म्हणतात त्याप्रमाणं तिचं वय चार-पाचशे वर्षांचं तरी नक्कीच असावं.'

इन्फॅडूसचे हे शब्द ऐकून सर हेन्री मोठ्यानं हसले आणि म्हणाले,

'इन्फॅडूस, तुम्ही इथली सगळीच माणसं अडाणी आहात. माणूस फार तर शंभर ते एकशे दहा वर्षे जगतो. मी निश्चितपणे सांगतो, गॅगूलचे वय नव्वद ते पंचाण्णवच्या दरम्यान असावं.'

इन्फॅडूसचा चेहरा थोडा विचारी झाला. पुन्हा एकदा हलक्या आवाजात तो म्हणाला,

'असेलही ! पण ट्वाला फार दुष्ट आहे आणि गॅगूल त्याच्याहून भयंकर आहे. गोऱ्या माणसांनो, आजची लढाई तुम्ही जिंकलीत त्यामुळे ट्वालाचा त्याच्या सगळ्या सैनिकांसमोर पराभव झाला. ही गोष्ट गॅगूलला अजिबात आवडलेली

नाही. मनात आणलं तर, ती आज रात्री ट्वालाचा खूनही करील.'

कॅप्टन गुड एकदम म्हणाला,

'असल्या जुलमी राजाला हे सैनिक अगोदरच का मारत नाहीत ?'

'त्यालाही काही खास कारण आहे. स्क्रॅगा हा त्याच्या बापाहून क्रूर आहे. त्यामुळं ट्वालाच बरा असं इथल्या लोकांना वाटतं.'

सर हेन्रींनी विचारलं,

'आणि या उम्बोपाचं काय ? याच्या बद्दल ती म्हातारी चेटकीण काहीतरी बडबडत होती.'

पण या बोलण्याकडं इन्फॅडूसचं लक्षच नव्हतं. तो स्वतःशीच पुटपुटत होता,

'असल्या दुष्ट लोकांच्या तडाख्यात आम्ही सापडलो आहोत. आत जर इमोटूचा मुलगा इग्नोसी जिवंत असता तर--- '

इतका वेळ शांत असलेल्या उम्बोपानं इन्फॅडूसचे शब्द पुरे होऊ दिले नाहीत. खणखणीत आवाजात तो म्हणाला,

'इग्नोसी मेलेला नाही. तुमच्या इग्नोसीला तुम्ही ओळखलं नाहीत काका ? हा इग्नोसी तर तुमच्या पुढंच उभा आहे.'

सर हेन्री चमकले. मला सुध्दा आश्चर्य वाटलं. कॅप्टन गुडचा जबडा तर आ वासलेला होता. आपल्या अंगाभोवती गुंडाळलेलं वाघाचं कातडं उम्बोपानं शांतपणे बाजूला केलं.

आम्ही सगळ्यांनी आश्चर्यानं त्याच्या कमरेकडं पाहिलं. गडद निळ्या रंगाच्या नागानं त्याची कमर वेढलेली होती.

ते पहाता क्षणीच इन्फॅडूस एकदम गुडघ्यावर खाली बसला आणि मुजरा घालत ओरडला,

'कूम ! कूम ! हा तर माझ्या भावाचा मुलगा. इग्नोसी आमचा राजा.'

पण इन्फॅडूसच्या शब्दामुळं उम्बोपा अजिबात हसला नाही किंवा फुशारूनही गेला नाही. त्याच्या चेहऱ्यावर शांत भाव होता. आपल्या काकांचा हात हातात घेऊन तो गंभीर स्वरात म्हणाला,

'उठा काका, मी अजून राजा झालेलो नाही. पण तुम्ही जर मदत केली तर मात्र ट्वालाला संपवून मी इथला राजा होईन.'

मी पुढं होवून उम्बोपाच्या खांद्यावरहात ठेवला आणि आश्वासक स्वरात

म्हणालो,

'तू सामान्य झुलू नाहीस याबद्दल आमची खात्री होतीच. तू तर झुलूंचा राजाच निघालास. या दुष्ट ट्वालाचं राज्य संपवून तू झुलू लोकांचा राजा व्हावास म्हणून आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू.'

इन्फॅडूस म्हणाला,

'ट्वालाच्या जुलमी कारभाराला सगळेच कंटाळले आहेत. त्यांनाही कुणी चांगला राजा हवाच आहे. मी तुला अभिवचन देतो की, माझ्या एका शब्दाखातर वीस हजार झुलू सैनिक तुझ्या खांद्याला खांदा लावून लढतील.'

इग्नोसी आमच्याकडं वळला आणि निश्चयी स्वरात त्यानं विचारलं,

'गोऱ्या माणसांनो, तुम्ही मला मदत केलीत तर सगळा खजिना मी तुम्हाला देईन. नाही तरी तो खजिना आम्हाला इथं नकोच आहे. त्या सॉलोमनच्या खजिन्यापायी आजवर फारच रक्तपात झाला आहे.'

सर हेन्री पुढं झाले आणि आपल्या बळकट हातांनी इग्नोसीचे रूंद खांदे पकडत ते बोलले,

'इग्नोसी, सॉलोमनच्या खजिन्याचं आम्हाला आकर्षण आहे. पण तो सगळा लुटून न्यावा अशी आमची अजिबात इच्छा नाही. तुला माहीतच आहे की, माझ्या भावाच्या शोधासाठी मी इथं आलो आहे. त्याचा शोध घेण्यासाठी तू आम्हाला मदत करशील एवढं अभिवचन दे, म्हणजे खूप झालं.'

इग्नोसीनं तसं वचन सर हेन्रींना दिलं. मग इन्फॅडूसकडं वळून हेन्री म्हणाले,

'माझ्या सारखा दिसणारा कुणी गोरा माणूस या भागात आला होता का ?'

काहीही न बोलता इन्फॅडूसनं केवळ नकारार्थी मान हलविली. सर हेन्री स्वतःशीच पुटपुटले,

'मग सगळ्यांचे श्रम फुकटच गेले म्हणायचे !'

इग्नोसी म्हणाला,

'सर हेन्री, तुम्ही निराश होवू नका. अजूनही तुमच्या भावाचा शोध लागू शकेल.'

त्या दिवशी संध्याकाळी इन्फॅडूसच्या झोपडीतच आम्ही सर्वांनी विश्रांती घेतली. रात्रीचा चेटकीणीचा खेळ पहायला आम्ही सगळेच उत्सुक होतो.

रात्र पसरली. रातकिड्यांनी त्यांचा कर्कश स्वर धरला. अंधाराच्या लोटांनी

आम्हाला गिळून टाकलं. मिणमिणत्या दिव्याच्या उजेडानं आजुबाजूचा सगळाच परिसर भेसूर आणि भयाण दिसत होता.

अचानक नगाऱ्याचा प्रचंड आवाज आसमंतात घुमायला लागला. दूरवर आगीच्या ज्वाळा आभाळाकडं झेपावलेल्या आम्हाला दिसल्या. चेटकिणीच्या खेळाला सुरवात झाली होती.

इन्फॅडूसनं आम्हाला खूण केली. त्याच्या पाठोपाठ आम्ही झोपडीतून बाहेर पडलो. समोरचं दृश्य अजब होतं. हजारो झुलू सैनिक शिस्तबध्द उभे होते. आगीच्या ज्वाळातून निघणाऱ्या प्रकाशामुळं त्यांचे भाले चकाकत होते. झोपडीतून विचित्र दिसणारा आसपासचा सगळा मुलूख आता चांगला भासत होता. माझ्या लक्षात आलं. इतका वेळ ढगाआड गेलेला चंद्र आता बाहेर पडला होता. त्याच्या मंद प्रकाशात आसमंत उजळून निघालं होतं.

पण या सुंदर दृश्यावर ग़ॅगूलनं पाणी ओतलं. ती महादुष्ट चेटकीण झोपडीतून नाचत नाचत बाहेर आली आणि तिनं एकेका सैनिकाकडं बोट दाखवायला सुरवात केली. थय्‌थय् नाचताना ती किंचाळत होती,

'मला रक्ताचा वास येतोय ! मला रक्ताचा वास येतोय !'

गॅगूलच्या खुणेबरोबर ट्वालाच्या अंगरक्षकांनी आणि स्क्रॅगानं निरपराध दुर्दैवी सैनिकांना मारण्यास सुरवात केली.

ते दृश्य रक्त गोठावणारं होतं. नाचता नाचता गॅगूलनं एकदम आमच्याकडं मोहरा वळविला आणि ती किंचाळली,

'यांचं रक्त हवय् मला ! यांचं रक्त !'

संतापलेल्या कॅप्टन गुडनं कमरेचं पिस्तुल उपसलं आणि तोही ओरडला,

'या गॅगूलचं रक्त हवय् मला ! ती तिचा कुटील डाव खेळून आम्हाला खलास करू बघतीय्.'

सर हेन्रींनी बंदुकीची थंड नळी, ट्वालाच्या छातीवर टेकवली आणि त्याहून थंड स्वरात ते ओरडले,

'कुणी एक पाऊल जरी पुढं टाकायची हिम्मत करा, ट्वाला संपलाच म्हणून समजा.'

सर हेन्रीच्या शब्दात अशी काही जरब होती की, ट्वाला आणि त्यांचे साथीदार हादरलेच. साऱ्या सैन्यावर भीतीची लहर सरसरत गेली.

ट्वाला तर घाबरलेलाच होता. घाईघाईनं तो म्हणाला,

'गोऱ्या माणसा, तुझी ही जादूची नळी बाजूला काढ. आजचा चेटकिणीचा खेळ आता संपलेला आहे.'

ट्वालाच्या या शब्दाबरोबर सगळेजण भराभर पांगले. आम्ही सुध्दा आमच्या झोपडीत आलो.

इन्फॅडूसनं त्याच्या बरोबर झुलू सैन्यातले काही अधिकारी बरोबर आणले होते. त्यांनी सुध्दा इग्नोसीच्या कमरेभोवती असलेला नाग पाहिला. एक वृध्द इग्नोसीला मुजरा घालत म्हणाला,

'हा आमचा खरा राजा आहे. ट्वालाच्या क्रूरपणाला सगळेजण कंटाळले आहेत. पण ट्वालाला पराभूत करण्यासाठी नागाची एवढीच खूण पुरेशी नाही. त्यासाठी काहीतरी चमत्कारच घडायला हवा. आम्हाला इग्नोसी राजा व्हावा म्हणून देवाचा कौल मिळायला हवा.'

आमच्या सगळ्या प्रवासात मी वारंवार दुभाष्याचं काम करत होतो. आता ही त्या वृध्दाचं म्हणणं सर हेन्री आणि कॅप्टन गुड यांना मी इंग्रजीत सांगितलं. ते ऐकल्याबरोबर कॅप्टन गुडनं एकदम चुटकी वाजविली आणि तो ओरडला,

'असा चमत्कार मी उद्याच करू शकेन.'

आम्ही सगळ्यांनीच कॅप्टन गुडकडं आश्चर्यानं पाहिलं. सर हेन्री म्हणाले,

'काहीतरी वेड्या सारखं बडबडू नकोस.'

'वेड्यासारखं नाही. प्रत्येक दिवसाची आपल्या प्रवासात मी नोंद ठेवली आहे आणि माझ्याकडं कॅलेंडरही आहे, हे पहा !'

'मग ? यात काय विशेष ?'

'विशेषच आहे. उद्या चंद्र ग्रहण आहे आणि ते आफ्रिकेत दिसणार आहे. या झुलू लोकांना सांगा की उद्या आम्ही काही काळ चंद्राला अदृश्य करुन टाकणार आहोत.'

'पण सगळं गणित तू नीट मांडलं आहेस ना ? जर काही यात गफलत झाली तर आपण सगळेजण इग्नोसीसकट संपलोच म्हणून समज आणि उद्या तर पौर्णिमा आहे.'

'त्याची अजिबात काळजी करु नका. माझं गणित एका सेकंदानं सुध्दा चुकणार नाही.'

मी कॅप्टन गुडचा शब्दप्रमाण धरला आणि त्या झुलू अधिकाऱ्याच्याकडं वळून म्हणालो,

'ठीक आहे तर, तुम्हाला देवाचा कौल हवा आहे ना ? उद्या रात्री आम्ही काय चमत्कार करतो ते पहा. आकाशातल्या चंद्रालाच आम्ही थोडावेळ अदृश्य करून टाकणार आहोत.'

त्या झुलू अधिकाऱ्याच्या तोडांतून भीतीची आरोळी बाहेर पडली आणि तो किंचाळला,

'काय ? आकाशातल्या चंद्राला अदृश्य करणार ? देवाचा चंद्र नाहीसा करणार ? अरे बापरे ! भयंकरच आहे हे !'

इन्फॅडूस गंभीर आवाजात म्हणाला,

'असं तुम्ही करू शकलात तर फारच उत्तम. कारण तुमच्या सामर्थ्यावर सगळ्यांचा विश्वास बसेल आणि सगळं झुलू सैन्य इग्नोसीच्या मागं उभं राहील.'

अगदी सुरवातीला बोललेला वृध्द झुलू अधिकारी पुन्हा म्हणाला,

'उद्या गोल चंद्राचा दिवस आहे. या दिवशी आमच्या राज्यातल्या सुंदर मुली नाच करतात आणि त्यातील सर्वात सुंदर मुलीला ट्वालाच्या भाल्याखाली मरावं लागतं. त्या मुलीला तुम्ही वाचवा. म्हणजे मग आम्ही तुमच्याच मागे आहोत.'

रात्र झाली. पूर्ण चंद्र क्षितीजावर उगवून झपाट्यानं माथ्याकडं सरकायला लागला. वार्षिक महोत्सव म्हणून सुंदर झुलु मुलींचं नृत्य सुरू झालं. त्यापैकी एका मुलीचं नाव होतं, फौलाटा. ती खरोखरच अतिशय सुंदर होती. सगळ्याच मुलींनी गळ्यात फुलांच्या माळा घातल्या होत्या आणि केसांमध्येही मुगुटाप्रमाणं फुलं खोचलेली होती. तास-दोन तास हा नाच चाललेला होता.

चंद्रग्रहणाची वेळ जवळ आली. आता केवळ एखादं दुसरंच मिनीटच राहिलं असावं. कॅप्टन गुडनं आम्हाला खूण केली. त्याबरोबर सर हेन्रींनी एक मोठी जाभई दिली. जांभईचा आवाज आल्याबरोबर नाच थांबला.

ट्वालानं एकदम फौलाटाकडं बोट दाखवलं आणि तो ओरडला,

'आजच्या नाचातील सर्वात सुंदर मुलगी म्हणजे फौलाटा आहे. तिला मेलंच पाहीजे.'

किचकिच आवाज करत गॅगूल भयाण हसली आणि ओरडली,

'बरोबर आहे, देवाला आज फौलाटाचा बळी हवा आहे.'

गॅगूलचे शब्द ऐकल्याबरोबर स्क्रॅगानं आपला भाला उचलला. फौलाटा भीतीनं लटलट कापत होती. हा सगळा भयानक प्रकार कॅप्टन गुडला अजिबात सहन झाला नाही. ताडकन् उठून तो ओरडला,

'थांबा'

फौलाटाला त्या शब्दाचा अर्थ कळला नसावा. पण तो शब्द आश्वासक होता, एवढं तिला उमजलं आणि ती पटकन कॅप्टन गुडच्या मागं दडली. त्या अवघड परिस्थितीत सुध्दा मला हसू आलं. कारण फौलाटाच्या कृत्तीमुळं एक गोष्ट मला चटकन समजली. माणसाच्या रंगात फरक असेल. त्याची भाषा वेगळी असेल. पण इथून तिथून सगळी माणसं सारखीच.

माझा एक डोळा चंद्रावर रोखलेला होता. कॅप्टन गुडचे शब्द तंतोतंत खरे ठरले. चंद्रग्रहणाला सुरवात झाली. मी पुढं सरसावलो. ओरडलो,

'सोडा त्या मुलीला. आम्ही देवदूत आहोत. ट्वाला, गॅगूल तुम्ही दोघंही पाहा की, तुमच्या डोळ्यासमोर काय चमत्कार घडतोय तो ! आम्ही हा पूर्ण चंद्र आता अदृश्य करुन टाकतो.'

लोकांनी आणि सैनिकांनी भीतीनं किंकाळ्या फोडल्या. सगळेजण भीतीनं थरारुन जाऊन चंद्राकडं पाहू लागले.

चंद्रग्रहणाला सुरवात झाली होतीच. हळूहळू चंद्र दिसेनासा होऊ लागला.

स्क्रॅगानं भीतीनं किंकाळी फोडली,

'आमचा गोल चंद्र मरतोय्. पण गोऱ्या माणसांनो, मी आता तुम्हाला सोडणार नाही.'

एवढं बोलून स्क्रॅगानं सर हेन्रीच्यांवर हल्ला चढविला. पण सर हेन्रीसारख्या कसलेल्या योध्द्यापुढं त्याचा टिकाव लागणं कठीणच होतं.

सर हेन्रींनी भाला हातात घेतलेल्या स्क्रॅगाचं मनगट डाव्या हातात घट्ट पकडलं आणि उजव्या हाताचा एक जोरदार ठोसा त्याच्या तोंडावर मारला. त्या फटक्यामागं जबरदस्त ताकद होती. त्या एकाच फटक्यानं स्क्रॅगाला खाली लोळवलं.

पण स्क्रॅगा पुन्हा उठू पहातोय असं पाहिल्याबरोबर सर हेन्रींनी त्याचा हात पिरगाळून त्याच तोंड मातीत लोळवलं आणि जवळच पडलेला भाला उचलून जबरदस्त ताकदीनिशी त्याच्या मानेत खोचला. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या.

स्क्रॅगा मरुन पडला आणि आकाशात चंद्रही मरत होता. इतकं भयंकर दृश्य

झुलूनी त्यांच्या आयुष्यात पाहीलं नव्हतं. बघता बघता ट्वाला आणि त्याचे हजारो सैनिक भीतीनं पळून गेले.

त्या उघड्या मैदानात आमच्याबरोबर आता इग्नोसी, इन्फॅडूस, फौलाटा आणि झुलू सैन्याचे सहा अधिकारी उरले होते. इन्फॅडूस म्हणाला,

'गोऱ्या माणसांनो तुम्ही तुमचा शब्द खरा केलात. आता आम्हाला आमचं वचन पाळलंच पाहिजे.'

ट्वालासारखा दुष्ट राजा केव्हा मरतो, याचीच अनेकजण उत्सुकतेनं वाट बघत होते. त्यामुळं इन्फॅडूस आणि त्याचे सहकारी यांना ही सोन्याची संधीच होती. इन्फॅडूसनं चंद्रग्रहणाच्या रात्रीच त्याच्या हजारो सैनिकांना एकत्र केलं.

लू या गावात एक नैसर्गिक खिंड तयार झाली होती. त्या खिंडीच्या आश्रयानं लढण्याचा निश्चय इन्फॅडूसनं केला होता.

दुसरा दिवस उजाडला. छे ! झुंजुमुंजु झालं. थोड्याच वेळात सूर्यानं आपले किरण लू गावावर टाकले. त्या किरणांबरोबर इग्नोसी ताडकन् उभा राहिला. हजारो सैनिकांसमोर त्यानं त्याच्या अंगावरचं वाघाचं कातडं बाजूला केलं. कंबरेभोवतीचा निळा साप सूर्याच्या किरणात चकाकला.

इग्नोसीनं त्याच्या हातातला भाला उंचावला आणि उंच स्वरात तो गरजला,

'तुमचा आवडता राजा इमोटूचा मी मुलगा. माझ्या कंबरेवरचं हे राजचिन्ह बघा. माझं नाव इग्नोसी. मी तुमचा खरा राजा आहे. नीच ट्वालाला खलास करण्यासाठी मी आलोय. बोला, कोण तयार आहे माझ्या बाजूनं लढण्यासाठी ? बोला !'

लू गावाच्या खिंडीतून इग्नोसीचे ते शब्द घुमले. आश्चर्यचकित झालेल्या सैनिकांनी काही क्षण इग्नोसीकडं एकटक पाहिलं. मग हजारो भाले उंचावले गेले. सूर्यप्रकाशात तळपणाऱ्या त्या भाल्यांच्या तेजानं आमचे डोळे दिपले. मग कानठळ्या बसतील असा प्रचंड आवाज उठला.,

'कूम ! कूम !'

पुढच्या अर्ध्या तासात इग्नोसी आणि इन्फॅडूस यांचं युध्दकौशल्य आम्हाला पाहायला मिळालं.

निम्मे सैनिक बरोबर घेऊन इग्नोसीनं खिंडीच्या तोंडाशी घोड्याच्या नाल्याच्या आकाराची रचना केली. इन्फॅडूसनं खिंडीच्या वरच्या भागात निम्मे सैनिक लपवले.

नालेच्या आकाराचा व्यूह शत्रूला आव्हान देणार होता. अजगर भक्ष्य गिळतो,

त्याप्रमाणं शत्रूला गिळून टाकण्याची ताकद त्या रचनेत होती.

ट्वाला आणि त्याचे साथीदार भेदरलेले असले, तरी एकदा दिवस उजाडल्यावर त्यांचा हल्ला येणार, हे अपेक्षितच होतं.

ट्वालाचा हल्ला येण्यासाठी आम्हाला फार काळ वाट पाहावी लागली नाही. मुंग्यांचा डोंगर अंगावर यावा त्याप्रमाणं ट्वालाच्या सैन्याची पहिली तुकडी इन्फॅडूसच्या सैन्यावर तुटून पडली.

भयानक रणकंदनाला सुरवात झाली. असं भयंकर दृश्य मी आयुष्यात पाहिलं नव्हतं. एखाद्या खेळातले सैनिक मरावेत, तसे शेकडो सैनिक रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळत होते.

मी, कॅप्टन गुड, सर हेन्री- आम्ही सगळेच दात ओठ खात युध्द करत होतो. आयुष्यात मी अनेक वेळेला युध्दाची चव घेतली होती. पण बंदुकीचं युध्द आणि तलवार- भाल्याचं युध्द यात केवढा मोठा फरक आहे, हे मी आज डोळ्यानं बघत होतो.

ट्वालाच्या आक्रमणाच्या लाटावर लाटा येतच होत्या. रक्ताचे पाट कसे वाहतात, हे बघतांना कॅप्टन गुड ओरडत होता. मांसाचा चिखल झाला होता. त्या प्रेतांना तुडवत झुलू सैनिक लढत होते.

किंकाळ्यांनी सगळं आभाळ भरुन गेलं होतं. कॅप्टन गुड आणि माझ्या तुलनेत सर हेन्री निश्चल होते. युध्दात विजय मिळवायचाच, या भूमिकेनं ते लढत असावेत.

ट्वालाचा शेवटचा हल्ला आल्यावर इग्नोसीनं मोठी युक्ती केली. घाबरल्याचा आव आणून त्यानं थोडी माघार घेतली. शत्रूला खिंडीत येऊ दिलं आणि नंतर इन्फॅडूसच्या सैनिकांनी शत्रूला वेढलं.

युध्दाचा हा निर्णायक क्षण होता.

पुढच्या अर्ध्या तासात कात्रीत सापडलेले ट्वालाचे सैनिक बळीच्या बकऱ्यांप्रमाणं कापले गेले. ट्वालाचा पूर्ण पराभव झाला. इग्नोसीला प्रचंड विजय मिळाला.

रानटी वेलींनी बांधलेल्या ट्वालाला इग्नोसीच्या सैनिकांनी फरपटत आणलं. सुटण्यासाठी त्याची केविलवाणी धडपड चालली होती. पण आता त्याला मृत्यूशिवाय दुसरा मार्गच नव्हता. शेवटचा प्रयत्न म्हणून त्यानं कुत्सितपणे इग्नोसीला विचारल,

'काय महाराज, तुम्ही माझं काय करायचं ठरवलंय ते मला कळू दे तरी !'

इग्नोसी निश्चल होता. एकेका शब्दावर जोर देत तो म्हणाला,

'ट्वाला, तू नीच आहेस. माझ्या वडलांना तू ठार मारलंस. आज तुझं रक्त पिणार आहे मी. समजलं ? तुला आज असा मृत्यू मिळेल की पुन्हा तुझ्यासारखी कीड या कुकुआनाच्या राज्यात कधीच निर्माण होणार नाही. अंगरक्षकांनो, याला झाडाला उलटा टांगा.'

ट्वालाची झांज उतरली. त्याचा मृत्यू त्याला अगदी स्पष्ट दिसला. तो किंचाळला,

'नको नको, इग्नोसी ! असली शिक्षा मला नको. मला वीरमरण दे.'

'ठीक आहे', इग्नोसी म्हणाला, ' ऊठ. तलवार हातात घे. आज मी तुला जिवंत सोडत नाही.'

ट्वाला उभा राहिला आणि फुत्कारत म्हणाला,

'नाही. मला तुझ्याबरोबर लढायचं नाही. हा हा-- गोरा दाढीवाला कोण आहे ? त्यानं माझ्या पोराला मारलं. मी या गोऱ्याला ठार मारणार.'

ट्वालानं बोट दाखवलेला मनुष्य म्हणजे सर हेन्री ! त्यांचंही रक्त सळसळलं. ताडकन् उठून ते गरजले,

'होय ! तुझ्या क्रूर मुलाला मी मारलं. आता तुलाही मारून कुकुआना राज्यातली घाण मी पूर्णपणे नाहीशी करतो.'

झुलू सैनिकांनी रिंगण धरलं. आम्ही सगळ्यांनी श्वास रोखले. सर हेन्री आणि ट्वाला- दोघंही उंचेपुरे आणि ताकदवान. दोन पहाड एकमेकांवर आदळावेत, तसं त्यांचं युध्द सुरू झालं.

दोघांच्याही उजव्या हातात लखलखणाऱ्या कुऱ्हाडी होत्या आणि डाव्या हातात उंच ढाली. दोघंही एकमेकांवर दात-ओठ खात घाव घालत होते. त्या प्रत्येक घावामागं प्रचंड ताकद होती. घाव ढालीवर बसले रे बसला की खणकन् अग्निकण उडत होते.

असल्या युध्दाचा ट्वालाला सराव होता, त्या तुलनेत सर हेन्री असं युध्द कधीच खेळलेले नव्हते. पण सर हेन्री हे खरे योध्दे !

अगदी शांतपणे, योजनापूर्वक त्यांनी पावलं उचलली. ट्वालाचे घाव त्यांनी ढालीवर झेलले. पण ट्वालाचा एक घाव त्यांच्या मांडीवर पडला होता. रक्तानं त्यांचे

कपडे भिजून गेले होते.

शेवटी ट्वाला दमला आणि सर हेन्रींनी प्रतिहल्ला चढवला. बघता बघता ट्वालाची दशा झाली. त्याची ढाल तुटली. भेदरलेला ट्वाला मागं सरकू लागला.

पण सर हेन्रीनी त्याला सोडलं नाही. एक जोरदार घाव त्यांनी असा घातला की धारदार पातं ट्वालाच्या छातीत कचकन् घुसलं.

भयानक किंकाळी देत ट्वाला रक्ताच्या थारोळ्यात पडला. झुलू सैनिकांनी आनंदानं 'कूम ! कूम !' चा गजर केला. काहीजण तर धावत पुढं आले आणि त्यांनी सर हेन्रीना डोक्यावर घेऊन नाचायला सुरवात केली.

कॅप्टन गुडही आनंदानं नाचायला लागला. उड्या मारायला लागला. कुणीतरी अचानक ओरडलं,

'आता गॅगूलची पाळी !'

'कूम ! कूम !'

पण इग्नोसीनं नकार दिला. धीरगंभीर स्वरात तो म्हणाला,

'गॅगूलचा निवाडा नंतर करू !'

इग्नोसी असं का म्हणतोय, हे मला कळेना. जखमी हेन्रींना उचलून आम्ही तंबूत आणलं. घाव बराच खोल होता. इग्नोसीनं त्यावर कसल्यातरी झाडाचा पाला बांधला. म्हणाला,

'उद्यापर्यंत जखम भरून येईल.'

'ते ठीकाय्. पण आज तू गॅगूलला जिवंत का बरं सोडलंस ? कारण गॅगूल तर सगळ्या निर्दयतेचं मूळ आहे.'

इग्नोसी हसला आणि म्हणाला,

'गोऱ्या माणसा, तुमच्या भल्यासाठीच मी तिला आज मारलं नाही.'

'म्हणजे ?' सर हेन्रीनी विचारलं.

'सॉलोमनच्या खजिन्याकडं जाण्याची वाट फक्त गॅगूलला माहीत आहे.'

सर हेन्रीनी कृतज्ञतेनं इग्नोसीचा हात आपल्या हातात घेतला. कॅप्टन गुडनं उडीच मारली. मी स्वतःशीच हसलो.

आता सॉलोमनचा खजिना दूर नव्हता !

***

## ५. खजिन्यातून सुटका

काही दिवसातच सर हेन्री यांची तब्येत सुधारली. त्यांच्या पायाची जखम पूर्ण भरून आली. सॉलोमनच्या खजिन्याकडं जाण्याचा दिवस इग्नोसीनं नक्की केला.

झुलू लोकांच्या रुढीप्रमाणं राजाला खजिना पाहता येत नसे. त्यामुळं आमच्याबरोबर इग्नोसी येणार नाही, हे निश्चित झालं.

इग्नोसीनं गॅगूलला सांगितलं,

'मला राज्य मिळवून देणाऱ्या या गोऱ्या लोकांना सॉलोमनचा खजिना बघायचा आहे आणि तू त्यांना खजिन्याकडं घेऊन जाशील. समजलं ?'

गॅगूल काहीच बोलली नाही. पण तिचं रूप अधिकच हिडीस दिसत होतं.

जरबेच्या स्वरात इग्नोसी म्हणाला,

'जर तू आज्ञा ऐकली नाहीस, तर आज तुझा शेवटचाच दिवस समज.'

ही भाषा गॅगूलला अचूक समजली. नाईलाजानं का होईना पण आमच्याबरोबर येण्याचं तिनं मान्य केलं.

आम्ही इग्नोसीचा निरोप घेऊन निघालो. आमच्याबरोबर इन्फॅडूस, फौलाटा आणि गॅगूल हे तिघं होते.

मजल, दरमजल करत आम्ही पहिला डोंगर ओलांडला. मग आम्हाला तीन टेकड्यांचं दर्शन झालं. या टेकड्यांनाच तीन चेटकिणी म्हटलं जात होतं.

तो सगळा आसमंत चमत्कारिक वातावरणानं भारला होता. अरुंद वाटेनं गॅगूल आम्हाला पुढं नेत होती. अचानक आम्ही एका प्रचंड गुहेच्या तोंडापुढं येऊन उभे राहिलो.

गुहेच्या तोंडाशी तीन राक्षसी आकाराच्या मूर्ती उभ्या होत्या. त्या मूर्ती पाहून आम्ही धसकलोच.

गॅगूल किचकिच करत हसली. म्हणाली,

'चला ! गोऱ्या माणसांनो, गुहेत चला. तुम्हाला हिऱ्यात न्हाऊ घालते.'

मी मागं वळून पाहिलं. डोंगरांचा घेरा असा पसरला होता की आम्हाला परतीची वाटही सापडली नसती.

इन्फॅडूस म्हणाला,

'मी इथंच थांबतो. मला आत जाण्यास परवानगी नाही. रात्री मुक्काम करावा लागल, तरी चालेल. मी इथं तंबू उभारतो.'

इन्फॅडूसला मागं ठेवून आम्ही गुहेच्या प्रवासाला निघालो.

आमच्या हातातल्या मशाली फुरफुरत होत्या. आत कभिन्न काळोख होता. कॅप्टन गुड शहारला होता. फौलाटा तर लटलट कापत होती.

गॅगूल मधेच गूढ हसायची.

काही तासानंतर आम्ही एका प्रचंड दगडी दरवाजासमोर येऊन उभे राहिलो. अंधारातच गॅगूलनं कुठली तरी एक कळ दाबली.

गडगड आवाज करत तो दरवाजा भिंतीत अदृश्य झाला.

पुढचा प्रवास विवरातून करायचा होता. आम्ही रांगत रांगत पुढं गेलो. मग थोडा वेळ चालत. आणखी एक मोठा दगडी दरवाजा गॅगूलनं उघडला.

आणिऽ--- आणि आमचे डोळेच दिपले. प्रचंड प्रकाशझोत आमच्या डोळ्यावर आला.

पण तो प्रकाशझोत नव्हता. ते हिऱ्यांचं तेज होतं. आत असलेला हिऱ्यांचा खजिना लखलखत होता.

सॉलोमनचा खजिना !

कॅप्टन गुड माकडासारखा उड्या मारायला लागला,

'मी जगातला सगळ्यात श्रीमंत मनुष्य आहे !'

हातातला दिवा बाजूला ठेवत सर हेन्री पुढं सरसावले. आम्ही खजिन्यात बुडून गेलो.

पैशानं मनुष्य आंधळा होतो म्हणतात. आमची तशीच अवस्था झाली होती. समोरची संपत्ती बघून आम्ही खुळे झालो होता. आंधळे झालो होतो. हिऱ्यांच्या

राशीत कॅप्टन गुड लोळत होता. खिसे भरभरून घेत होता.

या गडबडीत गॅगूलवर नजर ठेवायचं आमच्या लक्षात राहिलं नाही आणि– घात झाला.

एकदम फौलाटाची किंकाळी आमच्या कानावर आली.

मी चमकून मागं पाहिलं. झग्यातल्या लपवलेल्या सुरीनं गॅगूलनं फौलाटाला ठार केलं होतं. आम्ही आश्र्चर्याच्या धक्क्यातून बाहेर पडण्यापूर्वीच गॅगूलनं जलद हालचाल केली.

दगडी दरवाजाची कळ तिनं पटकन् दाबली. प्रचंड आवाज करत दरवाजा खाली आला.

त्या दरवाजाखालून पलिकडं जाण्यासाठी गॅगूलंनं झेप घेतली. पण तिचंही गणित चुकलं.

भिंतीतून खाली येणाऱ्या दरवाजाचा वेग प्रचंड होता.

त्या नीच गॅगूलच्या अंगावरच तो दरवाजा कोसळला. त्या प्रचंड वजनाखाली गॅगूलचा चेंदामेंदा झाला. तिची सगळी जीभ बाहेर पडली. ओरडण्याची संधीही गॅगूलला मिळाली नाही.

दगडी दरवाजा खाली आदळला, त्याचे प्रतिध्वनी काही वेळ घुमत राहिले.

मग अंगावर आली, ती शून्य शांतता ! काही क्षण तसेच गेले आणि सर हेन्री बोलले,

'आपण या खजिन्यात जिवंत गाडले गेलो आहोत !'

ते शब्द इतके भयंकर होते की आमच्या अंगावर सरसर काटा आला.

धीर धरून मी पुढं झालो आणि दगडी दरवाजाची कळ सापडते का ते पाहिलं. पण माझा प्रयत्न व्यर्थ होता.

'हा दरवाजा आतून उघडतच नसणार. म्हणूनच गॅगूलनं पलिकडं जाण्याचा प्रयत्न केला.'

कॅप्टन गुड मटकन् खाली बसला.

'तरीच ! तरीच ती नीच गॅगूल म्हणत होती-'आता हिरे प्या. हिरे खा. हिऱ्यात आंघोळ करा !'

सॉलोमनचा सगळा खजिना लखलखत होता. पण आता त्याकडं आम्हाला पाहवत नव्हतं.

आमचा मृत्यूच आम्हाला दिसत होता. अगदी स्पष्टपणे !

इन्फॅडूस गुहेच्या तोंडाशी असून काहीही उपयोग नव्हता. कारण त्याला खजिन्यापर्यंतचा रस्ता माहीत नव्हता.

काही तास गेल्यावर फुरफुरणाऱ्या मशाली थंडावल्या. अंधारानं आम्हाला गिळून टाकण्याचा प्रयत्न--- नाही, नाहीच. खजिना झळाळत होता ना !

चोवीस तासाहून अधिक काळ उलटला. मी एकदम सर हेन्रीना म्हटलं,

'पाहिलंत ! या गुहेतली हवा अजूनही ताजी आहे. ही जागा चहुबाजूनं बंदिस्त असती, तर आपण केव्हाच गुदमरून मेलो असतो.'

'तू म्हणतोयस ते अगदी बरोबर आहे. ही हवा कुठून बरं येत असावी ?'

कॅप्टन गुड इतका वेळ सुन्नपणे बसला होता. आता मात्र टुणकन् उडी मारून तो म्हणाला,

'मी शोधतो ती जागा.'

एखाद्या कुत्र्याप्रमाणं गुडनं प्रत्येक दगडाचा वास घ्यायला सुरवात केली. शेवटी त्यानं नेमकी जागा शेधली.

कंबरेचा सुरा उपसून मी त्या दगडाभोवती जागा केली. आता तर स्वच्छ वारा शीळ घालत आत येऊ लागला.

सर हेन्रींच्या मदतीनं मी तो दगड हलवला. आम्ही सगळ्यांनी आमचे खिसे सॉलोमनच्या खजिन्यानं भरून घेतले.

माझ्या पाठीवर चढून दोघंही सरकवलेल्या दगडाच्या खोबणीतून वर गेले. मग मलाही त्यांनी वर खेचून घेतलं.

अंधारलेल्या बोगद्यातून आम्ही पुढं सरकू लागलो. अगदीच दिसेनासं झालं, तर आम्ही काड्यापेटीचा उपयोग करत होतो.

त्या अरूंद बोगद्यातून प्रवास करतांना आमचं अंग सोलवटून निघालं.

पण जिद्दीनं, चिकाटीनं आम्ही पुढं जात राहिलो. प्रयत्न हाच परमेश्वर !

आणि आमच्या चिकाटीला यश आलं. आम्हाला हळुहळू सूर्यप्रकाश दिसू लागला. आम्ही कुठून कसे बाहेर आलो, कुणास ठाऊक ! आलो खरं !

बाहेरच्या लख्ख उजेडानं आमचे डोळेच दिपले. कुणीतरी उंच व्यक्ती आमच्यापुढं उभी होती.

डोळ्यावर आडवा हात घेत आम्ही पाहिलं. ती व्यक्ती म्हणजे इन्फॅडूसच होती !

जगातल आठवं आश्चर्य ते हेच !

इन्फॅडूसनं आम्हाला सावरलं. पाण्याचे चार घोट पोटात गेल्यावर आमच्या जिवात जीव आला.

आमची कहाणी ऐकून इन्फॅडूसनं देवाचे आभार मानले. तो म्हणाला,

'मृत्यूच्या तोंडातूनच बाहेर आलात गोऱ्या माणसांनो !'

आम्ही इग्नोसीकडं परतलो. त्यानंही आमचं पुन्हा स्वागत केलं. काही दिवस त्याचा पाहुणचार घेऊन आम्ही धष्टपुष्ट झालो. मात्र या सर्व घडामोडीत आम्हाला कुठेही नेव्हिलीचा शोध लागला नाही. जंगलातही सैनिक पाठवून तपास घेण्यात आला. काहीच उपयोग झाला नाही. त्यामुळं सरहेन्री नाराज होते. आमच्याही मनात ती रुखरुख होतीच.

एके दिवशी जड अंतःकरणानं इग्नोसीचा निरोप घेऊन आम्ही कुकुआनाची भूमी सोडली ! आम्हाला दूरवर पोचवण्यासाठी इन्फॅडूस स्वतः आला होता.

शेवटी परतीच्या प्रवासात वाळवंटातल्या पाणथळ जागेशी आम्ही आलो. तिथं एक तंबू होता. त्यातून एक माणूस लंगडत लंगडत बाहेर आला.

त्याला पाहिल्याबरोबर सर हेन्री ओरडले,

'कोण ? नेव्हिली ? तू ?'

देवाची लीला तरी किती अजब ! सॉलोमनच्या खजिन्याकडं निघालेला, पण जखमी झालेला नेव्हिली आम्हाला असा सापडला शेवटी !

त्याला घेऊन आम्ही दर्बान सुखरुप गाठलं. आता आम्ही लक्षाधीश होतो !

मित्रांनो, संपली माझी कथा !

तुम्ही मोठे लबाड आहात ! मी त्या हिऱ्यांचं काय केलं, हे तुम्हाला जाणून घ्यायचं असेल ना !

ते ही सांगतो तुम्हाला- सर हेन्रींनी आग्रह केला म्हणून मी इंग्लडला जाणाराय्.

आणि तिथं मी हिऱ्यांचा व्यापारी होणार, हेही सांगायला पाहिजे का ?

***

क्रमांक 2100
BVBK-0402890